डॉ. सरोज सहस्रबुद्धे

सादर करत आहे

शब्दफुलांचा गुलदस्ता

डॉ सरोज सहस्त्रबुद्धे

शब्दफुलांचा गुलदस्ता

लेखक – डॉ. सरोज सहस्रबुद्धे

14 The Coppice, Blackburn, BB2 7BQ, UK

Email id – drsaroj777@gmail.com

WhattsApp - +44-7952592212

निर्मिती सहाय्य- श्रीमती शैला जोशी किर्लोस्कर, रश्मी किर्लोस्कर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखक-लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ (दंड व तुरुंगवास) शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

शब्दफुलांचा गुलदस्ता

प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820 (Whatsapp for free ebooks)

प्रकाशन : २ जानेवारी २०२३

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

शब्दफुलांचा गुलदस्ता

डॉ सरोज सहस्त्रबुद्धे

परिचय

डॉ सरोज सहस्त्रबुद्धे

- जन्मगाव, माहेर आणि शालेय शिक्षण – धुळे
- संगीताची बालपणापासून आवड – शालेय जीवनात गांधर्व महाविद्यालयाच्या उपांत्यविशारद पर्यन्त चार परीक्षा (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण)
- शिक्षण – BSc (प्रताप कॉलेज, अमळनेर. प्रथम आल्याबद्दल कॉलेजचे पारितोषिक)
  - MSc व PhD च्या पदव्या – व्हिक्टोरिया युनिवर्सिटी, मँचेस्टर, इंग्लंड (जीवशास्त्र विषयात पाच वर्षे संशोधन करून)
- अनुभव – सात वर्षे मँचेस्टरच्या ख्रिस्ती कॅन्सर हॉस्पिटलमधे संशोधन क्षेत्रात कार्य
- इंग्लंडमधील १७ वर्षांचे (१९६४-१९८०) वास्तव्यात अनेक गायक व इतर कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करण्यात माझे यजमान व माझा प्रमुख सहभाग असे.
- भावसंगीत, शास्त्रीयसंगीत, हार्मोनियम, कीबोर्ड, व्हायोलिन व सतार ह्यांचेमधे अल्पसे प्राविण्य.
- १९८० ते २०१० पुण्यात स्थायिक. त्या काळात कॅन्सर शिक्षणाच्या प्रचाराचे कार्य – सुमारे शंभर लेख व लेखमाला विविध मराठी दैनिके व मासिकांमधून प्रसिद्ध. तसेच कॅन्सर आणि आरोग्य या विषयांवरची अकरा पुस्तके मराठीमधून प्रकाशित.
- आरोग्याव्यतिरिक्त, संगीत, चित्रकला, काव्य, नृत्य, प्रवासवर्णने इत्यादी विषयांवर ललित लेखन (पुणे व इंग्लंड)
- संगीताची आत्यंतिक आवड. उत्कृष्ट संगीत ऐकणे आणि त्यांचा संग्रह जोपासणे हा वर्षांनुवर्षांचा छंद
- होमिओपॅथी, मॅग्नेटोथेरपी, योगासने, फोटोग्राफी, ज्योतिष, आध्यात्म, वाचन, संगणक इत्यादींची आवड
- २०१० पासून इंग्लंडमधे पुन्हा वास्तव्य

पुस्तकाचं अंतरंग

शब्दफुलांचा गुलदस्ता या पुस्तकात रोजनिशी-व्यतिरिक्त, माझ्या नोंदवहीत (जर्नल) मी वेळोवेळी टिपून ठेवलेले विविध विषयांवरचे विचार आणि काही वैयक्तिक लेखांचा समावेश आहे. अशा लेखनाला कुठल्याही विशिष्ट विषयाचं बंधन नसल्यामुळे, ते काहीसे मुक्त आणि तितकेच विविधतापूर्ण आहेत (निरनिराळ्या जातीच्या फुलांनी तयार केलेल्या पुष्पगुच्छासारखे). मधूनच कधीतरी धुमकेतूसारख्या उगवणाऱ्या, किंवा नकळत दाटून येऊन मनात गर्दी करणाऱ्या विचार-प्रवाहांना मोकळेपणी शब्दबद्ध करण्याचा अल्पसा प्रयत्न. अशा काही विचारांचा आणि अनुभव-कथनांचा शब्दसंग्रह.

विभाग १ – **उत्स्फूर्त- शब्दांचे भावतुषार.**

विभाग २ – **प्रासंगिक- शब्दांच्या पलीकडले.**

विभाग ३ – **व्यक्तिगत- शब्द शब्द जपुन ठेव.**

पुस्तकाची पार्श्वभूमी

इंग्लंडमधलं दीर्घ वास्तव्य संपवून १९८० साली आम्ही भारतात परत आलो आणि पुण्याला स्थायिक झालो. भारतात परतल्यानंतरही, इंग्लंडमधे आरंभ केलेलं माझं रोजनिशी-लेखन पूर्वीप्रमाणेच चालू होतं. रोज किमान दोन-चार ओळी तरी **"मन की बात"** म्हणून लिहायच्याच हा शिरस्ताही मोडलेला नव्हता.

मात्र पुण्यात स्थायिक झाल्यावर, मी नियमीत स्वरूपाचं आरोग्यावरचं लेखन चालू केलं. ते म्हणजे - कॅन्सर आणि इतर आरोग्याशी संबंधित विषयांवरचे सुमारे शंभर लेख (आणि काही लेखमाला) विविध दैनिकं-साप्ताहिकं आणि मासिकं यांच्यासाठी लिहिले. त्यानंतर, कॅन्सर आणि आरोग्यावरची बारा पुस्तकेही प्रकाशित झाली.

वास्तवात माझं सगळं शिक्षण आणि अनुभव - विज्ञान, आरोग्य आणि वैद्यकीय क्षेत्रांशी संबंधित. कलाक्षेत्रामधली कुठलीच पदवी माझ्याजवळ नव्हती. त्यातून प्रदीर्घ काळ मराठीचा संपर्कही काहीसा दुरावलेला असल्यामुळे, बऱ्याच मराठी जाणकारांना माझी वाक्यरचना, इंग्रजी वळणानं जाते असं वाटे. पण ते थोडंफार अपरिहार्यच होतं.

शास्त्रीय विषयांवरचे लेख, लेखमाला आणि पुस्तकं लिहित असतानाच कधीकधी ललित विषयही मनात डोकावून जात. त्यावेळी, पेन हाती धरलं की जो शब्द किंवा विचार मनात असेल, त्याच्या अनुषंगानं जे जे सुचत जाईल, ते तसंच्या तसंच कागदावर उतरवणं एवढाच काय तो उद्देश

असे **(उत्स्फूर्त- शब्दांचे भावतुषार.).** एकप्रकारचा विक्षिप्त छंद्च म्हणू या हवंतर ! त्याव्यतिरिक्त, काही काही लेख मात्र मी जरा अधिक विचारपूर्वक म्हणजे एखाद्या प्रसंगाशी अथवा व्यक्तीशी निगडीत, पण थोडेफार जाणून बुजून लिहीत असे **(प्रासंगिक- शब्दांच्या पलीकडले)** आणि इतर काही वेळा मांडलेले विचार, विशेषत्वानं व्यक्तिगत आयुष्यक्रमाशी जोडलेले असत **(व्यक्तिगत- शब्द शब्द जपुन ठेव)**

अशा विविध प्रकारांनी, केवळ वैयक्तिक विचारांमधून शब्द-बद्ध केलेल्या लेखांचा हा **"गुलदस्ता"** असल्यामुळे, (रोजनिशीपासून तो जर्नल पर्यन्त आणि दैनंदिन घडामोडींपासून तो काही विशेष व्यक्ती-परिचयापर्यंतचा शब्दप्रवास) प्रस्तुत लेखनाला मी खऱ्या अर्थी "**शब्द-विचारांचा मुक्त आविष्कार**'' असंच संबोधन लावत असे. कारण त्याक्षणी मनामधे प्रगटणारे कोणते भाव कसा आकार आणि रूप धारण करतील, हे आधी सांगता किंवा ठरवताही येत नसे. त्यापैकी काही लेखांना किंवा विषयांना तर वयाचा, प्रतिष्ठेचा किंवा गुणवत्तेचाही मानदंड लावता येणार नाही (पुस्तक वाचतांना सूज्ञ वाचकांच्या ते ध्यानी येईलच!) असेच ते काहीसे सहज मनात डोकावलेले, पण उत्स्फूर्त **(spontaneous)** विचार असत (कधी कधी थोड्या विचारांती सुचलेले अथवा एखाद्या प्रसंगाशी, वाचनाशी निगडीत तर कधी जवळच्या काही व्यक्तींशी संबंधित). कुणा वाचकांना ते वाचायला बरे वाटतील किंवा इतरांना अतिसामान्यही वाटतील. तरीही वेळोवेळी मनात दाटलेल्या भाव-तरंगांना शब्दबद्ध करून, त्या विचारांना मुक्ती आणि मनाला शांती मिळवल्याचं समाधान मात्र मी

भरपूर अनुभवत असे. अशा निर्बंध, निराकार आणि निरहंकारी विचारांचे विषयही जवळपास काहीही **(Any subject under the Sun)** असत. अंताक्षरीत जसं आपण एक अक्षर उचलतो, तसाच कुठलाही शब्द किंवा शब्दसमूह उचलून त्यावर मी लिहायला आरंभ करीत असे.



माझ्या आईनं लिहिलेल्या (राधाबाई गोगटे) अंताक्षरी या पुस्तकानंही मला एकेकाळी लेखनाची बरीच स्फूर्ती दिली.

मुक्तछंदानं रेखाटून शब्दबद्ध केलेला-रानफुलांपासून तो बागेतील फुलांपर्यंतचा-हा आगळा वेगळा गुलदस्ता!

मनोगत

वास्तवात पुस्तकाची पार्श्वभूमी लिहीत असताना, संपूर्ण पुस्तकाबद्दलचं माझं मनोगत आणि त्यामागची भूमिका, मी वर विस्तारपूर्वक मांडलेली आहेच. त्यामुळे त्याची पुनरुक्ती करण्याची आवष्यकता नाही.

या पुस्तकाची प्रत तयार होत असताना, ज्या चार लोकांचं सहकार्य मला लाभलं, त्यात प्रामुख्यानं माझा मुलगा डॉक्टर नील सहस्रबुद्धे, ई-साहित्य प्रतिष्ठानचे माझे प्रमुख मार्गदर्शक-सल्लागार आणि हितचिंतक श्री सुनीळ सामंतजी (व त्यांचे सर्व सहकारी) आणि माझ्या हस्तलिखिताचं टंकलेखन अत्यंत तत्परतेनं, सुबक आणि तितकंच अचूकपणे करून देणाऱ्या मायलेकी, श्रीमती शैला जोशी किर्लोस्कर आणि त्यांची कन्या रश्मी किर्लोस्कर. या सर्व मंडळींचे अगदी मनापसून खूप खूप आभार आणि धन्यवाद!

हे माझं पाचवं पुस्तक, जगभरच्या ई-साहित्यच्या वाचकांसमोर सादर करताना मनाला, मनापसून आनंद होतो आहे. किमानपक्षी एका वाचकानी जरी माझ्या या पुस्तकाबद्दल त्यांच्या रोजनिशीत अथवा मोबाइलमधे छोटीशी नोंद केली, अथवा त्यांचा अभिप्राय कळवला, तरी या लेखनाचं खऱ्या अर्थी सार्थक झालं असंच मी समजेन.

नोंदवहीत (जर्नल) लेख लिहितांना मी

अर्पणपत्रिका

शब्दफुलांचा गुलदस्ता हे प्रस्तुत पुस्तक शब्दबद्ध करण्याची प्रेरणा ज्या लेखक, साहित्यिक, कवी आणि हितचिंतकांनी मला दिली, त्या सर्वांना ही आगळी-वेगळी साहित्यकृती सादर समर्पण.

अनुक्रमणिका

शब्दफुलांचा गुलदस्ता

विभाग १ – उत्स्फूर्त- शब्दांचे भावतुषार

• जुने फोटो	
• शब्द-शब्द	
• विचारचक्र	
• मनाचं मोरपीस	
• काव्य आणि कविता	
• ग्रंथमित्र	
• ज्ञान	
• संगीत	
• आयुष्याची मार्गक्रमणा	
• विचारांच्या पलीकडले	
• निर्मितीचे शिल्पकार	

विभाग २ प्रासंगिक - शब्दांच्या पलीकडले

●योगी पुरुषांची आत्मचरित्रं	
●याला जीवन ऐसे नाव	
●स्वभावधर्म	
●वास्तूमधल्या वस्तू	
●असाही एक छंद – पत्र लेखन	
●परिपूर्ण जीवन	
●आम्हा भारतीयांच्या परदेशी व्यथा	
●संतांचिये गावी प्रेमाचा सुकाळ	

विभाग ३ व्यक्तिगत - शब्द शब्द जपुन ठेव

●आम्ही पुणेकर झालो	
●माझी शाळा, माझं गाव	
●आमचे परमस्नेही अंबादास वाघ आणि त्यांची "फुलराणी"	

विभाग १

उत्स्फूर्त- शब्दांचे भावतुषार

- जुने फोटो
- शब्द-शब्द
- विचारचक्र
- मनाचं मोरपीस
- काव्य आणि कविता
- ग्रंथमित्र
- ज्ञान
- संगीत
- आयुष्याची मार्गक्रमणा
- विचारांच्या पलीकडले
- निर्मितीचे शिल्पकार

जुने फोटो

काळानं माणसात किती स्थित्यंतरं घडू शकतात याचा अचंबाच वाटतो. जुने फोटो हे त्याचं एक उत्तम उदाहरण आहे. तरुणपणी काढलेले, प्रमाणबद्ध शरीराचे आणि तेजस्वी चेहऱ्याचे फोटो, हे जुन्या आठवणी जागृत करायला पुरेसे ठरतात. त्यांचं निरीक्षण करताना कधी अभिमान वाटतो, कधी थोडी खंतही वाटते पण त्यातच भरपूर आनंदही असतो. शेवटी फोटोही प्रतिकात्मकच असतात. शरीर बदलतं, वय पुढे सरकतं, व्यक्ती बदलतात पण फोटोंमधले 'आपण' मात्र त्याच पूर्वीच्या जागी असतो.अगदी भूतकाळातल्यासारखे ताजेतवाने आणि स्फूर्तिदायी! म्हणूनच मला वाटतं देवांच्या तसबिरींमधले समस्त देव सुद्धा नेहमी चिरतरूण, आकर्षक आणि सुंदरच रंगवलेले असतात आणि असावेत. अगदी मनाला भावतील इतके विलोभनीय!

शब्द-शब्द

उत्स्फूर्तपणे अवतरणारे शब्द हे खऱ्या अर्थी तसेच असायला हवेत. कागदाला पेनचा स्पर्श झाला, की त्याक्षणी मनात जे आणि जसे विचार येतील ते- फारसा विचार न करता- तसेच्या तसे कागदावर उतरायला हवेत. सहजरित्या घडून जाणाऱ्या गोष्टींचं स्वरूप आणि विचारपूर्वक, हेतूपुरस्सर, नियोजन करून मुद्दाम घडवून आणलेल्या विचारांचं स्वरूप अगदी भिन्न असतं. एकावर हृदयाचा अंमल असतो तर दुसऱ्यावर मेंदूचा. त्यामुळे अंतःकरणापासून एखादी गोष्ट केली, तर त्यात अधिक भावना असतात.

कुठल्याही लेखनासाठी चिंतन-मनन तर आवश्यक आहेच, अभ्यासही हवा. पण त्याचबरोबर अज्ञात आणि अद्भुत अशी प्रेरणाही हवी. संथ वहाणाऱ्या दैनंदीन जीवनक्रमात छोट्या मोठ्या प्रसंगांचे जे तरंग उठत असतात, ते जर आपण वेळोवेळी ‘शब्दबद्ध’ करू शकलो तर त्यापैकी कोणता अनुभव, प्रसंग किंवा घडामोड उद्या महत्त्वाची ठरेल, हे आज ठरवता येत नाही. त्याशिवाय, कागदावर नोंदवलेले असे मौलिक शब्द, उद्या काळाच्या ओघात विरून आणि विसरून गेल्याची हळहळ किंवा खंत तरी मनाला वाटणार नाही. कुणी सांगावं त्यातूनच पुढे कुणाच्या तरी हातून, एखादी भव्यदिव्य साहित्यकृतीही निर्माण होऊ शकेल.

विचारचक्र

“विचारचक्र” ही किती अजब आणि आनकलनीय चीज आहे. कधीकधी विचार करता करता आपण कुठल्या कुठे भरकटत जातो. जुन्या-जुन्या आठवणी-स्वप्नांसारख्या मनात डोकावून जातात. वेगवेगळया विषयांच्या शिड्यांवरून, साप-शिडीच्या खेळासारख्या उड्या मारीत मारीत विचार खाली-वर धावत असतात आणि अशा मोकाट सुटलेल्या विचारचक्रांना थांबवताना, आपल्या मनाची मात्र त्रेधातिरपीट उडत असते.

काही वेळा स्वत:च्याच अशा खोल खोल विचारांमधे इतकं गुरफटून जायला होतं की त्यावेळी आपण आपले नसतोच. लोकांमधे वावरत असूनही एकप्रकारची आलिप्तता असते. हास्यविनोदही कानांवरून जात असतात पण त्यात पुरेसा रस वाटत नाही, इतरांच्या बोलण्याकडे थोडसं दुर्लक्ष, काहीसं मौनव्रत आणि तटस्थता. पण मनात मात्र विविध विचारांचं तांडवनृत्य चालू असतं.

दिवसाकाठी खरं म्हणजे आपण किती विचार हाताळतो (किंवा तोंडाळतो). पण ढगांसारख्या दिशाहीन विचारांना पटकन भरकटू न देता ताब्यात ठेवलं, तरच चांगलं संभाषणही घडू शकतं. नाहीतर प्रश्न एक आणि उत्तर मात्र वेगळंच अशी स्थिती सहजच होऊ शकते. मनातल्या आणि जनातल्या आपल्या विचारांमधे सुद्धा काही वेळा इतकी मोठी तफावत

असते, की आपण स्वतःच स्वतःची फसवणूक किंवा प्रतारणा तर करीत नाही ना असं वाटावं.

दिवसभरात मनात डोकावणाऱ्या वेगवेगळ्या विचारांचं जर आपण जाणून बुजून अवलोकन करायचं ठरवलं तर लक्षात येतं की, चोवीस तासात आपले विचार दाही दिशांना धांवून आलेले असतात. आनंद, दुःख, खेद, उद्वेग, निंदा, चांगुलपणा, व्यवहार, विधायक- विचार अशा असंख्य गोष्टींच्या, प्रसंगांच्या आणि भावनांच्या झेपा आणि खेपा चालू असतात. स्वैर सुटणाऱ्या अशा विचारांवर जो माणूस हुकमीपणानं बंधन घालू शकेल त्यालाच खऱ्या अर्थानं **“विचारी व्यक्ती”** किंवा **“तत्वज्ञानी”** म्हणायला हवं.,

मनाचं मोरपीस

कधीकधी जुन्या, पण रम्य आठवणी काढण्यामधेही एकप्रकारचा वेगळाच अनिवार्य असा आनंद असतो. त्यातून आवडत्या व्यक्ती, सुखद प्रसंग, मनाला प्रेमाचा ओलावा आणि गारवा देणारे आनंदमय क्षण आठवताना तर मन अगदी भारावून जातं, हळवं बनतं. हळव्या मनाला दंवबिंदूंचा रोमांचक ओलावा जाणवतो.

असं वाटतं आपणही तो कोवळा बिंदू बनावं. लवलवत्या गवताच्या पात्यावर, सूर्याच्या उन्हात चमकून तरारून निघावं. खऱ्या हिऱ्यासारखं तेजस्वी व्हावं नाहीतर कोमल, नाजूक मोरपिसासारखं हलकंफुलकं बनावं. मोरपंखी रंगछटांची हळुवार उधळण करावी.

मोरपिसाचा तो उघडझाप करणारा जांभळाजर्द चमकता डोळा-. नक्की कोणत्या दिवशी आपल्या मनाचं मोरपीस बनतं? मेघगर्जना करणाऱ्या ढगांना पाहून की तापलेल्या धरतीवर चार थेंब बरसून, ओला तजेला आणणाऱ्या त्या मृगाच्या मोतीसरांना पाहून? अशा हळुवार भावनांच्या

स्पर्शानं, मनमोराचा पिसारा फुलारून येतो कां? कां येऊ नये? सारे शेवटी मनाचेच खेळ. जसे खेळू, जसे डाव टाकू, तसा त्यांचा आनंद लुटता येणार.

मोराचा रंग, रूप, पीस आणि पिसारा, काय काय भुरळ पाडणारं असतं? वास्तवात सारंच काही! तसंच तर मोहरलेल्या मनाचं आहे. मनात खोलवर डोकावून पाहिलं, तरच त्याच्या खऱ्या सौंदर्याची, कोमलतेची, नाजूक आविष्कारांची जाणीव होते. आणि मग कुठेतरी आपल्याच मनाचा-मनाला नाजुकसा स्पर्श होतो. अगदी हळुवारपणे, कळत-नकळत स्पर्शून जाणाऱ्या मोरपिसासारखा!

काव्य

काव्याच्या वाचनानं आणि मननानं बुद्धीला आणि विचारांना भरपूर चालना मिळते हे तर खरंच. आपण स्वतः काव्य जगत नाही तर तो प्रसंग जगतो. पण त्या प्रसंगाचं हुबेहूब चित्र रंगवून, ते मनःपटलावर साकार करणं, म्हणजेच वास्तवात काव्य नाही का? थोडक्या शब्दात महान अर्थ प्रगट करणं, अव्यक्त भावनांना मुक्ती मिळवून देणं आणि अनेकांच्या रूक्ष जीवनात आनंद फुलवणं, हे यशस्वी काव्याचे मूळ गुणधर्म असायला हवेत. कवींच्या मनाची ओळख करून घेण्यासाठी, काव्याचे विषय, मांडणी आणि रसपरिपोष यांचा पुरेपूर आस्वाद घेण्यासाठी, काव्यवाचनाचा छंद जरूर जोपासायला हवा. काव्यवाचन आणि श्रवण यांनी मलाही भरपूर आनंद दिला आहे आणि कधीकधी थोडीशी स्फूर्तीही! आत्ताच सुचलेल्या या मजेशीर कविता: (जराशा बालिश पण उत्स्फूर्त!)

●म्हटलं तर कविता:

काहीतरी लिहावंसं वाटतं, पण विषयच सांपडत नाही-
गाणं गावंसं वाटतं, तेव्हां सूरच जुळत नाहीत-
काहीतरी रंगवावंसं वाटतं, पण रंगच गवसत नाहीत. आणि
कुणीतरी यावंसं वाटतं तेव्हां मात्र दारच वाजत नाही!

खूप काही करावंसं वाटतं, पण कामच आठवत नाही आणि
काहीतरी घडावंसं वाटतं, तेंव्हा काहीच घडत नाही.
जीवनातले असे सारे आडाखेच चुकतात,
वेळा टळून जातात पण त्यांचं भानच रहात नाही.

दिवस उगवतो, तो देखील-
काही घडण्यापूर्वीच मावळतो.
रात्र पडते तेव्हा-
उगीचच पहाट व्हावीशी वाटते.
सारं काही असतांनाही, काहीच नसल्यासारखं वाटतं. आणि-
आहे तेही नसल्याची जाणीव मात्र, मन जाळू लागतं.

****

●असंही मन- तसंही मन:

आपल्याच मनाची-आपणच करीत असतो-कितीदा मनधरणी!
साळसूदपणाचा देखावा कितीही केला,
तरी तो असतो साराच वरकरणी।
कधी मन बनतं एक हट्टी बालक।
त्याला वठणीवर आणण्यासाठी-मग
बनावं लागतं एक सुजाण पालक!
त्या हट्टीपणाला आळा घालण्यासाठी-
आतूनच द्यावी लागते दटावणी।
मनाचेच खेळ आणि मनाचीच खेळणी,
मोडली तरी मनाला थोडीच बसणार असतात बोलणी?

कधीतरी आपलंच मन-
आपल्यावरच रुसून दूर जाऊन बसतं-
रागे भरलं तरी "त्याला"
कशाचंच सोयरसुतक नसतं।
सांगून समजावून अखेर आपलंच मन विटतं,
आणि **रागाचा आविष्कार पाहून, मनाला मात्र जोरात हंसू फुटतं!**

****

- **तत्वज्ञानी वृक्ष:**

फळाफुलांनी डंवरलेल्या वृक्षांनाच
खऱ्या अर्थी कळलेला असतो,
जगण्यामधला अर्थ!
समृद्ध जीवन जगूनही,
डोकावलेला नसतो,
त्यांच्या मनात
जरासाही स्वार्थ!
सर्वस्व समर्पित करतानाही,
दवडलेले नसतात त्यांनी,
आनंदी क्षण व्यर्थ!

माणसांमधले हेवेदावे मात्र,
उगीचच घडवत असतात
मोठमोठाले अनर्थ!
मग साध्याभोळ्या वृक्षांपासूनच,
का शिकू नये आपण
उच्च कोटीचा परमार्थ?

****

ग्रंथमित्र

‘ग्रंथ हे माणसाचे मित्र आहेत.’ हे वाक्य किती सार्थ वाटतं! ज्यांना वाचनाची मनापासून आवड आहे, अशा लोकांना तर ते वेगळं पटवून देण्याची गरजच नाही. सच्च्या मित्रापासून आपल्या ज्या काही अपेक्षा असतात, त्यापैकी निम्म्या तरी पुस्तकवाचनामधून सफल होतातच. एकटेपणाचा कंटाळा आला की वेळ घालवण्यासाठी काही वेळा आपण पुस्तकांकडे धांव घेतो. त्यात मनोरंजन आहे, ज्ञानसंवर्धन आहे, जगाबरोबर आपण चालतो आहोत याचा आनंद आणि इतरही बरंच बरंच काही.

बिचाऱ्या निरक्षर लोकांना मात्र सगळी माहिती इतरांच्या बोलण्यातूनच गोळा करावी लागते. त्यांच्यापेक्षा आपण किती भाग्यवान! म्हणून तर असं वाटतं की, जगामधल्या प्रत्येका माणसाला जरुरीपुरतं तरी लिहा-वाचायला येणं अत्यावश्यकच आहे.

वास्तवात, विश्वामधल्या यच्चयावत सगळ्या विषयांचं आणि ज्ञानाचं भांडार, पुस्तकरुपानं आपल्यासमोर उभं असतं! आपण फक्त त्या खजिन्याची दारं उघडायची आणि आपली आवड-वेळ-कुवत या सगळ्यांचा मेळ घालून, भरपूर वाचनानं आपलं आयुष्य खऱ्या अर्थी समृद्ध बनवायचं!

मला स्वतःला विविध विषयांवरची असंख्य पुस्तकं आवडतात.

वाचनालयात प्रवेश केला की पुस्तकांच्या बाबतीत अधाशीपणा काय असतो, ते जाणवतं. मनात विचार येतो की, हे संपूर्ण शब्दभांडार वाचून काढण्यासाठी खरेखरीच किती जन्म घ्यावे लागतील कोण जाणे. कुठलंही पुस्तक निवडताना त्याचं आकर्षक मुखपृष्ठ, गुळगुळीत कागद, मोठी दाणेदार अक्षरं आणि हातात सहज मावणारा आकार या गोष्टीही मला नेहमी जास्त भावतात. पण अशा बाह्य आकर्षणाव्यतिरिक्त, ते पुस्तक वाचनीय मात्र अवश्य हवंच. मनात ठसायला तर हवच हवं!

खूप वाचायचं असलं तर वाचनाचा वेगही तसाच हवा. काय वाचलं त्याची मनातल्या मनात उजळणी व्हायला हवी. मनाला स्पर्श करून जाणारा पुस्तकाचा भाग मनाच्या खोल कप्प्यात सुरक्षित राहील याची काळजी घ्यायला हवी आणि बाकी मजकूर लवकरात लवकर मनावेगळा करायला हवा.

उत्तम पुस्तकांचा संग्रह करणं हा देखील माझा फार फार आवडता छंद बनला आहे. कारण कोणत्या दिवशी काय वाचावंसं वाटेल ते आधी सांगता येत नाही. माझ्या संग्रहामधे कथा, कादंबरी, काव्य, प्रवासवर्णने, कला, शास्त्र, आरोग्य, विज्ञान, गृहोपयोगी, आध्यात्म, चरित्रे, आत्मचरित्रे, संतसाहित्य अशा अनेकविध विषयांवरची असंख्य पुस्तके आहेत. (परदेश-वास्तव्यात यापैकी जवळपास काहीच मराठी वाचायला ‘न’ मिळाल्यानं, ती हौस मी भारतात परत आल्यानंतर पूर्ण करते आहे) त्यामुळे ग्रंथ हे माझे नुसते मित्र नाहीत तर सखे, सोयरे, संबंधी नव्हे- जिवलग मित्रच आहेत!

ज्ञान

वाटतं, सगळं विश्वच विखुरलेल्या ज्ञानकणांनी भरून गेलंय. जितकं आपण वेचत जाऊ, आत्मसात करू आणि आपल्यात सामावून घेऊ तितकं कमीच. वास्तवात माहिती आणि ज्ञानाचे अथांग सागर-महासागर आपल्याभोवती पसरलेले असतात. सात जन्म घेतले तरी ज्ञानसंपादन करणं संपणार नाही. उभ्या आयुष्यात त्यापैकी ओंजळभर ज्ञानबिंदूंचं आचमन जरी करता आलं, तरीही पूर्ण आयुष्याची कमाई होईल. पण जसजसं आपण ज्ञान सांठवण्याची आणि जमा करण्याची धडपड करीत असतो, तसतसं त्यापैकी काही निसटूनही जात असतं. आणि योग्य वेळी त्याचं पुरेसं जतन केलं नाही, तर हाती मात्र फारच थोडं शिल्लक उरतं. तेव्हा या अथांग ज्ञानाचा संचय करायचा तरी कसा? कसं टिकवून धरायचं हे धन? कसं जतन करायचं आणि त्यात सातत्यानं भर घालून ते वाढवायचं तरी कसं?

खूप शिकावंसं वाटतं. सगळ्याच गोष्टी शिकाव्यात, थोड्याफार तरी आकलन व्हाव्यात आणि आत्मसात कराव्यात, असा हव्यास वाटतो. पण ते कसं शक्य आहे? बुद्धी आणि विचारसरणीलाही शेवटी मर्यादा असतातच. त्यातून आपल्या तुटपुंज्या ज्ञानाची जाणीव, फार उशीराच्या वयात झाली तर त्याचा काय फायदा? तोपर्यंत उमेदीची वर्षं मागे पडलेली असतील आणि आठवण ठेवण्याची मेंदूची शक्ती क्षीण व्हायला लागलेली असेल त्याचं काय? शिवाय आज आकलन झालेलं ज्ञान, उद्या गतीमान होऊन पुढेपुढे सरकेल त्याचं तरी काय? तरीही, शिकण्याची क्रिया, ज्ञान संपादन करण्याची मार्गक्रमणा अव्याहत चालू रहायलाच हवी. आज आत्मसात केलेल्या गोष्टींचं मनन, चिंतन केलं, तर त्यापैकी थोड्या ज्ञानाची साठवण तरी भविष्यात कामी येईल.

ते काहीही असलं तरी, सुशिक्षित अथवा अशिक्षित, कुठल्याही व्यक्तीच्या जीवनाला 'ज्ञानाची जोड' ही हवीच. मग ते पुस्तकातून संपादन केलेलं ज्ञान असो, नाहीतर 'अनुभव' या शिक्षकानं दिलेलं असो.

जय गणेशा ज्ञानदायका! (Knowledge is a real blessing from you!)

संगीत

उत्तम संगीताचे सूर असे काही साक्षात्कारी असतात, की जीवनातल्या परमोच्च अनुभूतीचीच फक्त त्यांच्याबरोबर तुलना करता येईल. तो आनंद खऱ्या अर्थी कुणाला सांगता किंवा दाखवता येत नाही तर प्रत्येकाला तो केवळ स्वतःचा स्वतःलाच अनुभवता येऊ शकतो. (असे सात्त्विक आनंद तसेही आपले आपल्यालाच मुद्दाम शोधावे लागतात). कर्णमधुर संगीत हे श्रोत्याला वेगळ्याच विश्वात घेऊन जातं. साऱ्या चित्तवृत्ती प्रफुल्लित बनतात. सूरांवर तरंगावंसं वाटायला लागतं आणि अंतःकरणाला जाऊन भिडणारे सूर, आपल्याबरोबरच इतरांनीही ऐकावेत आणि

त्याचा आनंद त्यांनीही मनमुराद लुटावा असं मनोमन वाटतं. संगीताची गोडी अवर्णनीय तर आहेच, त्यात परमोच्च आनंदाच्या ऊर्मी आहेत आणि स्वर्गीय सुखाचा आविष्कारही. असं स्वर्गीय संगीत ऐकण्यासाठी कान तर उघडे हवेतच पण मनही विशाल बनवायला हवं. सूरांची प्रत्येक संवेदना आणि नादश्रुती कानामनात साठवायला हवी. मनाचे कान व्हायला हवेत. आनंदाची कारंजी उडायला हवीत. संगीताच्या माधुर्यानं न्हाऊन निघायला हवं. अंगाअंगातून, रोमारोमांतून सूर पाझरायला हवेत, शरीरावर रोमांच

फुलायला हवेत.प्रत्येक सूर एक चमचमणारा तारा बनून, सारी रन्ध्रे प्रकाशमान व्हायला हवीत. (अगदी “रन्ध्रात पेरिली मी आषाढ दर्द गाणी” सारखा). संगीताचा आविष्कार देणाऱ्याची आणि ऐकणाऱ्याची एकतानता व्हायला हवी.

सुरांमधे भाव आहेत, भावना आहेत-मनात खोलवर पोहोचणाऱ्या भावना. त्यांचा हळुवार स्पर्श मनाला झाला, तरच त्या सूरांचं सार्थक घडेल. लय, सूर, शब्द आणि भावनांचा मिलाफ झाला, की त्यामधून जो अनामिक आनंद निर्माण होतो, त्यापेक्षा स्वर्गीय सुख वेगळं ते काय असणार?

संगीत ऐकताना स्वतःला विसरायला हवं.नव्हे स्वतःच ते संगीत बनायला हवं. द्वैत नष्ट व्हायला हवं. उच्च कोटीचं संगीत जिथे सुरू होतं, तिथंच आपलं अस्तित्व संपायला हवं. त्या नादलहरींवर तरंगणं, हिंदोळणं--समाधी अवस्थेच्या किती जवळची ती अवस्था असणार! गानसमाधी-ऐकणाऱ्याची आणि ऐकवणाऱ्याची. जीवनामधले जे काही उच्च कोटीचे आनंद आहेत, त्यापैकी काळजाला जाऊन भिडणारं संगीत हे फार वरच्या स्थानावर आहे. ती एक अभिजात कला आहे. पण त्या कलेसाठी खडतर तपश्चर्या आहे आणि म्हणूनच चिरकाल सुखसंवेदना देणारं सौंदर्य!

(धन्य ते स्वर्गीय संगीत आणि धन्य ती स्फूर्तीदेवता-सरस्वती माता! जय शारदे वागेश्वरी!)

आयुष्याची मार्गक्रमणा

कधीकधी वाटतं की आयुष्य उलट्या क्रमानं मागे सरकावं. पुन्हा भूतकाळात जावं, म्हणजे आतापर्यंतच्या आयुष्याची वाटचाल चालताना ज्या ज्या चुका घडल्या, त्या दुरुस्त करायला वाव मिळेल, आणखी एक संधी मिळेल. आणि मग आयुष्याची सुधारीत, मनाजोगती आवृत्ती पुनश्च जगता येईल. फुलपाखरू बनत असताना त्याची जी सुरवंटाची पूर्वावस्था असते, तसा सुरवंट बनून पुन्हा एकदा आरंभ करावा, म्हणजे फुलपाखराच्या स्वच्छंदी आयुष्याची मजा, खुमारी दुसऱ्यांदा लुटता येईल.

दुसरा असाच मनात डोकावलेला एक मजेशीर विचार:

वाटतं काहीतरी खूप खूप घडावं. दिवसाला, दिवसाच्या प्रत्येका तासाला, मिनिटाला आणि क्षणाक्षणाला अर्थ प्राप्त व्हावा. एकेका क्षणात उपयुक्त असं ठासून काहीतरी भरता यावं. म्हणजे उगवणारा प्रत्येक नवा दिवस खऱ्या अर्थानं जगल्याचं आणि सार्थकी लागल्याचं समाधान तर मिळेलच पण त्यापुढे येणारे सगळे दिवसही आनंदानं जगण्याची, नवी कोरी उमेद मनात जागवली जाईल.

“वेळेचा सदुपयोग, दुसऱ्यांना जाणून घेण्यासाठी वेळ काढणं, मिळालेले सगळे मौल्यवान क्षण खऱ्याखुऱ्या अर्थानं सत्कारणी लावणं” या साऱ्या कल्पना अतिशय रम्य आणि विलोभनीय वाटतात. त्या कल्पनांचं आकर्षणही वाटतं आणि मनात येतं, असंच सातत्यानं आयुष्यात काहीतरी सुखद घडत राहावं, वेळेचं सार्थक व्हावं, वेळात वेळ गुंफत रहावा आणि त्यातूनच मार्गक्रमणा करीत सुंदर आयुष्य घडावं. पण खरंच प्रत्यक्षात मात्र असं काही घडत असतं का?

आपल्याला अपेक्षित आणि अभिप्रेत असलेला असा “आनंदाचा अनमोल ठेवा” क्वचितच वाट्याला येतो. आणि तो देखील मिळवण्यासाठी आधी दुःख, अपेक्षाभंग, निराशा यांच्याबरोबरच कलुषित विचार, विकार आणि नकार या सगळ्या अडथळ्यांना पार करावं लागतं. त्यासाठीच प्रथम

आपल्या डोळयांवरचा चष्मा काढून, बाजूला ठेवून, दुसऱ्यांच्या नजरेतून स्वतःकडे पहाणं शिकायला हवं, विनाकारणच गर्दी करून बसणारी गैरसमजांची किल्मिषं, मनातून वेळीच दूर करायला हवीत, तरच आयुष्याकडे जास्त शुद्ध, स्वच्छ आणि स्पष्ट नजरेनं बघता येईल. आयुष्य गतीमान असतं. ते तर स्वत:च्या गतीनं पुढे सरकतच असतं, मार्गक्रमणा चालूच असते. त्या प्रवाहात आपणच जाणून बुजून पण बेमालूम सामील व्हायला हवं. आपण धीरानं उडी घेऊ शकलो नाही तर काठावरच राहून जाऊ. उडी घेऊनही, प्रवाहाच्या विरूद्ध दिशेनं पोहण्याचा प्रयत्न केला, तर प्रवाहाबाहेर फेकले जाऊ. **“जो थांबला तो संपला, जो सामावला तो जिंकला.”** त्यामुळे आपल्या वाट्याला जे आणि जसं आयुष्य येईल त्यात पूर्ण समाधानी राहून मार्गक्रमणा करायची तयारी हवी. वास्तवात **“रस्तेच आपला मार्ग आखतात- आपण फक्त त्यावरून चालत असतो.”**

विचारांच्या पलिकडले

मलाही लिहायचंय. खूप खूप लिहायचंय. मनात आलेल्या सगळ्या विचारांना शब्दबद्ध करायचंय. वाचकांना आवडेल की नाही याची तमा न बाळगता केवळ लिहीत रहायचं आहे. लेखणी बंद पडायला नको आहे, विचार सरायला नको आहेत आणि प्रतिभा आटायला नको आहे.

मन विचार करीत असतं. मेंदू त्या विचारांना चालना देतो, रोज नवं नवं खाद्य पुरवतो, आणि त्यातल्या निवडक शब्द-विचारांचे कागदावर मोती बनू शकतात. शब्दफुले एकत्र गुंफून, त्यांच्या सुंदर सुंदर विलोभनीय माळा बनू शकतात. त्यासाठीच विचार हे धारांसारखे प्रवाही हवेत, सातत्यानं वहात, किंवा धबधब्यासारखे कोसळत राहायला हवेत. तरच त्यातून सुंदर आणि गोजिरवाण्या, गोंडस, चमकदार शब्दांचे तुषार उडत रहातील. फेसाळते विचार, दुधासारखे शुभ्र, स्वच्छ, निर्लेप विचार. सातत्यानं उसळत रहाणारे, बंध न पाळणारे, किंवा झुगारून देणारे, सळसळते, खळाळते विचार. जिवंत वाटणारे, शुद्ध, पवित्र आणि नवनव्या भावनांनी, कल्पनांनी उसळून येणारे, लाटा निर्माण करणारे. कितीही उंचावरून कोसळले, तरी घायाळ-जखमी न होणारे. पुनश्च ताठ उभे रहाणारे, सामावून जाणारे आणि घेणारे प्रवाही विचार !

स्वतःचं वेगळं अस्तित्व दाखवूनही, वेगानं वहाणाऱ्या विचारप्रवाहात मात्र, पूर्णपणे अस्तित्वहीन बनणारे, समर्पण करूनही पुनश्च

नव्या जोमानं ताठरून उठणारे! विचारधारांच्या त्या उडत्या तुषारांमधे, सळसळत्या शक्तीमधे उत्साह आहे, आनंद आहे, चालना आहे, चेतना आहे आणि नवजीवनाचा, नवनिर्मितीचा जन्मोत्सवही. उंचीवरून उडी घेण्याचं भय नाही तर साहसाचा आनंद आहे, सार्थक आहे. बालकाच्या कोवळ्या मनाची थरथर आहे आणि हर्षानंदानं थुई थुई नाचणारी कारंजीही.

पण त्याच विचारथेंबांचं शब्दप्रवाहात रुपांतर झालं, की त्यांना संथपणा आणि स्थिरता येते. गती मंदावते. अवखळ बालिशता कमी होऊन एक धीमी लय सुरू होते. अगदी आपल्या आयुष्यासारखीच. मनामधले खळाळते विचार, बंडखोर विचार एकदा ‘शब्दबद्ध’ झाले की त्यांचं अस्तित्वच पालटून जातं. थोडसं विलिनीकरण, थोडी शरणागती आणि बरचसं समर्पण!

“समर्पित जीवन” असायला मुळीच हरकत नसावी पण स्वतःचं सुंदर, तजेलदार अस्तित्व, कायमचं हरवून बसण्याइतकंही ते समर्पित नको. पाण्यात मिसळतानाही आपला मूळ रंग सोडता कामा नये. उलट पाण्यालाच आपला रंग प्राप्त करून द्यायला हवा. शेवटी आपलेच विचार आणि आपलेच शब्द! कसे दूर ठेवणार त्यांना एकमेकांपासून? नेहमी हातात हात घालूनच चालणार ते !

निर्मितीचे शिल्पकार

'निर्मिती' हा खरोखरीच एक सुखद अनुभव असतो. आपल्या आवडीची एखादी कलाकृती निर्माण करीत असताना त्यात आपण तासन् तास रंगून जातो. भोवतालच्या जगाचा काही काळ तरी पूर्ण विसर पडतो. ती "एकतानता" म्हणजे एकप्रकारची समाधीच असते. परमेश्वराशी एकरूप होण्यासारखंच असतं ते! कुठलीही समाधानकारक उत्तम निर्मिती आकार घेत असताना, परमेश्वराशी द्वैत रहातच नाही. आपण काम करीत असतो. पण त्यामागचा कर्ता-करविता तो स्फूर्तीदाताच असतो. वाटतं, तीच अगाध, अद्भुत शक्ती आपल्या हातांच्या किंवा इतर कौशल्यांच्या माध्यमांमधून काहीतरी अद्वितीय निर्माण करून घेते आहे. मग ती चित्रकला असो, शिल्पकला असो, संगीत असो नाहीतर ग्रंथनिर्मिती किंवा अगदी यंत्रनिर्मिती सुद्धा!

अशाच प्रकारच्या अनेक कलाकृतींची निर्मिती जगभर चालू असते. त्यामधून प्रत्येकाला केवढं समाधान आणि आनंद मिळत असणार. लोकांपुढे आपण काहीतरी आगळं-वेगळं जन्माला घालीत आहोत याचा अभिमान वाटत असणार. नाहीतरी आपली सगळी धडपड कुठल्यातरी आनंदाचा शोध घेण्यासाठीच तर चालू असते. कलाकार तो आनंद त्यांच्या

कलेमधून मिळवतात, पण इतर शिल्पकारांना तर प्रत्यक्ष “निर्मितीची कलाच” अवगत झालेली असते.

मात्र त्यासाठी प्रत्येकानंच कांही ‘ताजमहाल’ निर्माण करण्याची आवश्यकता नसते किंवा तानसेन असण्याचीही. उत्तम कलाकृती तर छोट्याशा सुपारीमधे गणेशमूर्ती कोरूनही बनू शकते. म्हणूनच ज्या गोष्टींमधून आपल्याला सात्त्विक समाधान आणि काहीतरी आगळं-वेगळं निर्माण केल्याची अनुभूती मिळू शकते, ज्या गोष्टी निर्माण करताना आपण देहभान विसरतो, त्या सातत्यानं करीत रहायला काय हरकत आहे? त्यामुळे मन तर प्रसन्न आणि टवटवीत रहातंच, चित्तवृत्ती प्रफुल्लित होतात आणि उत्तम कलाकृती, स्वत:बरोबरच इतर अनेकांनाही आनंदित करू शकते.

मात्र निर्मितीचा खरा आनंद, प्रथमतः आपल्या स्वतःलाच मिळायला हवा. तरच त्यामधलं सौंदर्य जगाला दिपवू शकेल. परिश्रम तर हवेतच, तपश्चर्याही हवी, त्याचबरोबर अद्भुत प्रेरणा आणि प्रोत्साहनही हवं. कोणीतरी अधिकारी व्यक्ती आणि शक्ती आपल्याला अदृश्यरूपाने मार्गदर्शन करते आहे, अशी दृढ श्रद्धाही बाळगायला हवी.

कुठल्याही निर्मितीचा असा सात्विक आनंद कशातच तोलता येत नाही. पण प्रत्यक्ष अनुभवता मात्र येतो. मग तो गायन, वादन,किंवा नृत्यकले-पासूनचा असो, नाहीतर शिल्पकला, चित्रकला किंवा इतर कुठल्याही कलांपासूनचा असो.

निर्मितीच्या अगदी वेगळ्या स्तरावरच बोलायचं तर, माझ्या मते, फुलबाग फुलवणारे माळी, कपडे शिवणारे शिंपी, दागिने घडवणारे सोनार, विणकरी, सुतार, लोहार, कुंभार चर्मकार, ही सर्व मंडळी सुद्धा, उत्तम निर्मितीचे शिल्पकारच असतात!

विभाग २

प्रासंगिक- शब्दांच्या पलीकडले

- योगी पुरुषांची आत्मचरित्रं
- याला जीवन ऐसे नाव
- स्वभावधर्म
- वास्तूमधल्या वस्तू
- असाही एक छंद – पत्र लेखन
- परिपूर्ण जीवन
- आम्हा भारतीयांच्या परदेशी व्यथा
- संतांचिये गावी प्रेमाचा सुकाळ

योगी पुरुषांची आत्मचरित्रं

योगी पुरुषांची आत्मचरित्रं किंवा चरित्रं म्हणजे वास्तवात चिंतनीय आणि मननीय विचारांचा खजिनाच. त्यापासून नवी दृष्टी, ज्ञान आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त करून घेणं, हे आपल्यावरच निर्भर असतं. हाती असलेल्या फुरसतीच्या वेळात काय करावं असा प्रश्न मनात आला, की त्याचं उत्तर- वाचन, विचार आणि आत्मनिरिक्षण हे देखील असू शकतं.

नुकतंच परमहंस योगानंदांचं चरित्र वाचलं **(An Autobiography of a Yogi)** आणि खूप काही आत्मसात करावंसं वाटलं. मोठ्या लोकांच्या साध्या साध्या गोष्टी वाचण्यापासून सुद्धा, एकप्रकारचा सात्त्विक आनंद प्राप्त होतो. अखेर अशा प्रकारच्या ग्रंथांचं वाचन आणि त्यावर चिंतन म्हणजे मन:शांती मिळवण्याचा गवसलेला नवा मार्गच! त्याचं मोल कशातच तोलता येत नाही.

याला जीवन ऐसे नाव

वसंत पोतदारांचे कितीतरी लेख आज वाचले. वास्तविक आमची दीर्घकाळाची मैत्री. भरपूर पत्रव्यवहारही झालेला. पण कधीकधी त्यांच्यासारख्या बहुरूपी लेखकांचे काही सखोल विचार, प्रत्यक्ष त्यांच्या पुस्तकांमधूनच अधिक कळायला लागतात. पोतदारांसारखे, स्वतःबद्दल किंवा इतरांबद्दल इतक्या मोकळेपणानं लिहिणारे लेखक क्वचितच सापडतात. त्यांची भाषा फार रसाळ किंवा ओघवती नाही (कारण त्यांचा तो पिंडच नाही.) पण मतितार्थ मात्र निवडक, वेचक आणि रोजच्या व्यवहारामधला-सर्वसामान्यांना रूचेल, पचेल असाच. (”**भीमसेन”** **“कुमार” “गाडगेबाबा” “अग्निपुत्र”, “योद्धासन्यासी-विवेकानंद”** ही आणि अशी त्यांची काही निवडक पुस्तकं, या विधानाची साक्ष पटवतात). “प्रत्येका लेखकानं स्वतःच्या मनाची व्यथा किंवा विचार, कथेमधल्या नायक-नायिकेच्या तोंडूनच कथन करावी असा काही नियम नाही!” (हे त्यांचच संभाषणामधलं एक आवडतं वाक्य!).

प्रत्यक्षात मात्र, वसंत पोतदारांचं लेखन आणि व्यक्तिमत्व यात फार मोठी तफावत आहे. प्रवास करणं हा त्यांचा नुसता छंदच नाही तर **weakness**च आहे. घरी आले की नेहमी म्हणतात: “माझ्या पायांना चाकं बांधलेली आहेत. त्यामुळे मी सतत फिरस्ताच करीत असतो.” वास्तवात प्रवासानंच तर आपली दृष्टी विशाल बनते; अनुभवांच्या शिदोरीत सतत भर

पडते; मनुष्यस्वभावाचे विविध नमुने जवळून पहायला मिळतात आणि जीवनमूल्ये काय आहेत याची प्रत्यक्ष माहिती होते. चाकोरीमधलं, कंटाळवाणं बनू पहाणारं आयुष्य, काही काळ तरी आपण विसरू शकतो. शिवाय, फिरण्याची आवड असणारे इतर सहप्रवासी भेटले, तर आनंदाची देवाण-घेवाणही होऊ शकते. (**“फिरस्ता”** या वसंत पोतदारांच्या पुस्तकावरून आत्ता माझ्या मनात डोकावलेले हे काही विचार.)

जगाकडे बघण्याचा प्रत्येक माणसाचा दृष्टीकोन तरी किती भिन्न भिन्न असतो. मजाच वाटते कधीकधी. कुणाला वस्तूच जमवायला आवडतात, त्यात आगपेट्यांपासून गाड्यांपर्यंत कुठल्याही वस्तूंचा समावेश असू शकतो. कुणाला आयुष्यभर भटकंतीच करायला आवडते. बहुसंख्य लोक सुखाचा संसार थाटून मुलाबाळांमधे रमतात तर काही अपवादात्मक व्यक्ति, संसारातून उठून, सर्वसंगपरित्याग करून संन्यासी बनतात. कुणाला परंपरागत रूढींना घट्ट बिलगून बसावंसं वाटतं, तर इतर काहींना रूढींचे सगळे बंध झुगारून, मुक्तपणे संचार करावासा वाटतो.

काही लोकांना आपण सतत काहीतरी (मग ते काहीही असो) करावं असं सातत्यानं वाटत असतं, तर बाकी कितीतरी लोकांना काहीही ‘न’ करण्यातच धन्यता वाटत असते. व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रकृती तितक्या विकृती आणि चमत्कृती हेच खरं!

“जो जे वांछील तो ते लाभो प्राणिमात्र” आणखी काय म्हणणार?

स्वभावधर्म

मनुष्यस्वभावाचे चित्रविचित्र नमुने आपल्याभोवती रोज आपण पाहत आणि अनुभवत असतो. ‘व्यक्ती तितक्या प्रकृती’ हे तर ओघानं आलंच. दिवसभराच्या प्रवासात असंख्य व्यक्ती आपल्या दृष्टीसमोरून जात असतात. बसमध्ये, रस्त्यावर, दुकानांमध्ये कुठंही गेलं तरी माणसांचं दर्शन अपरिहार्यच असतं. कुठलीही व्यक्ती बघताना, प्रथमदर्शनी आपण फक्त त्यांच्या बाह्यस्वरूपाचाच अंदाज घेऊ शकतो. पण प्रत्येक व्यक्तीच्या आत दडलेल्या स्वभावधर्मांचा मात्र क्वचितच विचार करतो.

त्यापैकीच काही लोकांशी आपला प्रत्यक्ष परिचय झाला, की हळूहळू त्यांच्या स्वभावाचे बारकावे लक्षात यायला लागतात. काहींचे स्वभाव आपल्या स्वभावाशी जुळणारे असले, तर त्यांच्याबरोबर अधिक जवळीक निर्माण होते. मात्र काही लोकांचे स्वभाव आपल्या अपेक्षांच्या चौकटीत बसणारे नसले, तर अशा व्यक्तींशी आपण बेताबेताचेच संबंध ठेवतो. काही काही लोकांच्या स्वभावाला मात्र, विशिष्ट असे गुणधर्मच नसतात. त्यामुळे अशा व्यक्तींचा परिचय होऊनही, क्वचितच आपण त्यांचा विचार करतो.

म्हणतात ना ‘समानशीले व्यसनेषु सख्यं’, जसं सारख्या आवडी-निवडी, सारखे विचार, समान परिस्थिती किंवा समवयस्क लोकांचं एकमेकांशी चटकन पटतं. पण या सर्वसामान्य अशा ढोबळ नियमालाही-

मनुष्यस्वभावांच्या नमुन्यांइतकेच अपवादही सापडतात. जसं की काही मोठी माणसं, लहान मुलांमधे अत्यंत तन्मयतेनं मिसळतात. तसंच काही अगदी विरूद्ध स्वभावाचे, आणि टोकाच्या आवडी-निवडी असणारे लोकसुद्धा, तासन् तास एकमेकांशी छान गप्पा मारू शकतात.

तेव्हा कुणाशीही पटवून घेणं न घेणं, हे अखेर प्रत्येका व्यक्तीची सहनशीलता, इतरांबद्दलचा आदर व्यक्त करण्याची वृत्ती, स्वभावाचे बारकावे किंवा लोकांना जाणून घेण्याची कळकळ. या आणि अशा गोष्टींवरच अवलंबून आहे. अतिशय कडक आणि दुराग्रही स्वभावाच्या, किंवा अहंभाव बाळगणाऱ्या व्यक्तींचं सुद्धा, कुणी ना कुणी ‘श्रद्धास्थान’ असतंच. तसंच लाजऱ्याबुजऱ्या, घाबरट लोकांकडूनही कधीकधी वाखाणण्याजोगी धैर्याची कामं घडतात.

मूळ स्वभाव बदलणं आपल्या हाती नाही (‘जित्याची खोड’ वगैरे वगैरे) हे जरी कितीही खरं असलं, तरी प्रयत्नांनी काहीही साध्य करू शकणारा माणूस (चंद्रावर-मंगळावर सुद्धा जाऊन पोहोचणारा) आपला एवढासा स्वभाव बदलू शकणार नाही किंवा किमानपक्षी वाकवूही शकणार नाही, हे मात्र जरा ‘अस्वाभाविकच’ वाटतं!

वास्तूमधल्या वस्तू: (एक विचार तरंग)

आपल्या घरात आपण रोजच वावरत असतो. पण कित्येक वेळा अगदी डोळ्यासमोर असलेल्या वस्तू सुद्धा आपल्याला सहजासहजी दिसतच नाहीत. असं का? वास्तवात दिवसाकाठी असंख्य वेळा आपली नजर त्या वस्तूंवर पडतेही. पण त्यावेळी, आपलं लक्ष मात्र दुसरीकडेच गुंतलेलं असल्यामुळे, किंवा डोळ्यांना त्या वस्तू रोजच बघण्याची संवय झालेली असल्यामुळे, अगदी नजरेसमोर दिसणाऱ्या गोष्टींचा ठसा सुद्धा मनावर उमटतच नाही. मग कधी घर आवरायला लागलं की खऱ्या अर्थानं काना-कोपऱ्यात किती वस्तू जमलेल्या (किंवा जमवलेल्या) आहेत ते दृष्टोत्पत्तीला यायलालागतं.

त्यापैकी बहुसंख्य वस्तू या विशिष्ट वेळेला महत्त्वाच्या वाटल्यानं आपण संग्रही ठेवलेल्या असतात. कधी पुढेमागे चुकून त्यांची गरज भासली आणि त्याच वेळेला आठवण झाली, तर त्यांना बाहेरची हवा आणि उजेड मिळतो. नाहीतर, अडगळीत अडगळ करून, वर्षानुवर्ष सुद्धा त्या तशाच पडून रहातात.

घरामधे खऱ्या अर्थी, लागणाऱ्या आणि "न" लागणाऱ्या वस्तूंची जर आपण वर्गवारी करायला आरंभ केला, तर असं जाणवतं की, जेमतेम पन्नास टक्के वस्तू आपण नियमीत वापरतो. पंचवीस टक्के वस्तूंचा वापर, कधीतरी अधूनमधून करतो आणि उरलेल्या पंचवीस टक्के सामानाची जपणूक,

निव्वळ वेळप्रसंगी कामी येतील या आशेवरच आपण केलेली असते. केवळ टाकायला धैर्य होत नाही, म्हणूनच कितीतरी वस्तू घरात आपलं स्थान टिकवून असतात. अशा सामानामधे अर्थात मोठ्या झालेल्या मुलांच्या पाळण्यांपासून तो जुनी खेळणी,कपडे पुस्तकं, मासिकं, भांडीकुंडी, पादत्राणं पत्रं, फायली अशा शेकडो वस्तूंचा समावेश असू शकतो.

त्यासाठीच, वर्षातून दोनदा तरी, सगळ्या घराची बारकाईनं पाहणी करून, नको असलेल्या वस्तू, मन घट्ट करून टाकून देणं, मागे पडलेल्या पण उपयुक्त वस्तूंना पुढे आणणं, काहींवरची धूळ झटकणं, कपड्यांना हवा दाखवणं, भांडीकुंडी, डबे-बाटल्या घासून पुसून स्वच्छ बनवणं, पडदे धुऊन आणणं, गाद्या उलट्या पालट्या करणं, पत्रं आणि कागदपत्रं वाचून त्यांची नीट वर्गवारी करणं, अशा असंख्य गोष्टींनी, रहात्या वास्तूचा कायापालट घडवून आणता येईल.

आपलं आवडतं शरीर जसं आपण रोज धुतो, केसांची निगा राखतो, चेहऱ्याची काळजी घेतो, आकर्षक कपडे घालतो त्याचप्रमाणे, ज्या घरात आपल्यासारख्या “निर्मळ” व्यक्ती वावरतात, ते वातावरणही शुद्ध-स्वच्छ-आकर्षक असायलाच हवं. घरामधली प्रत्येक वस्तू वेळोवारी जागेवर ठेवणं, आठवणीनं त्यांचा उपयोग करणं, काळजी घेणं आणि एक नवीन वस्तू घरात आणताना, छोटी का होईना दुसरी वस्तू मन घट्ट करून कमी करणं, हे घरात रहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचच आद्यकर्तव्य असायला हवं. तरच अभिमानानं म्हणता येईल की: **असावे घर ते आपुले छान!**

असाही एक छंदः पत्रलेखन

भारतातून आलेली लांबलचक, माहितीपूर्वक आणि ओलाव्यानं भरलेली पत्रं, ही परदेशात असताना मला फार मोठी मेजवानीच वाटे. त्यापैकी बहुसंख्य पत्रांमधल्या मजकुरानं थेट भूतकाळात पोहोचायला वेळ लागत नसे. मनाला समाधान तर वाटेच, आनंदही होत असे पण काही काही पत्रांमुळे एक उत्साहाची लाट मनात उसळे. आयुष्यात खूप काही करणाऱ्यांचा क्षणभर उगीचच हेवा वाटला, किंवा त्यामुळे स्वत:बद्दल थोडीशी खंतही वाटली, तरी अशा पत्रांमधले संदेश मात्र प्रेरणादायीच ठरत.

भावंडांची सविस्तर पत्रं आली की मन संमिश्र भावनांनी तुडुंब भरून येई. गेली कित्येक वर्षे आम्हा भावंडांमध्ये अत्यंत प्रेमाचे, आपुलकीचे आणि जिव्हाळयाचे संबंध टिकून आहेत, याचा रास्त अभिमान वाटे. सासरच्या मंडळींनाही मोठमोठाली पत्रे लिहायला मला मनापासून आवडत.

आयुष्यात माणसाला अंतापर्यंत जतन कराव्याशा वाटतात त्या विविध गोष्टींपैकी, आपल्या आवडत्या व्यक्तींबद्दलचा आदर किंवा प्रेम, मोकळेपणी व्यक्त करता येणं, ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यापासून मिळणारा आणि टिकणारा आनंदही चिरकाल सुखदायीच ठरतो.

“पत्रलेखन हा वास्तवात प्रत्येकाच्या अंतर्मनाचं स्वच्छ प्रतिबिंब दाखवणारा आरसा आहे” असं म्हटलं तरी वावगं ठरू नये. त्यात माझ्या मनाचे कवडसे देखील आजपर्यंत असंख्य लोकांनी पाहिले असतील. कारण लांबलचक वर्णनात्मक पत्रे धाडणं, ही माझी नुसतीच आवड नव्हे, तर एकेकाळचा फार मोठा छंद, किंवा वीक पॉइंटच होता. परदेशातून आलेली माझी पत्रं, कित्येक लोक, आवर्जून संग्रही ठेवतात हे वाचून तर, पत्रलेखन सार्थकी लागल्यासारखंच वाटे. अर्थात इतरांची भावपूर्ण पत्रे वाचतानाही त्यांच्या विचारांची, स्वभाववैशिष्ट्यांची उंची, रुंदी, खोली आणि मनाची जडणघडण यांचा अंदाज घेता येई.

ज्या पत्रामधला मजकूर दीर्घकाळ मनात घोळतो, काहीतरी विचार करायला लावतो, ज्यात आपुलकी आणि जिव्हाळा आहे पण प्रतारणा नाही अशी पत्रं मला मनापासून आवडतात. अशा असंख्य पत्रांचा भलामोठा संग्रह आज माझ्याजवळ जतन केलेला आहे. त्यात नातेवाईक, मित्रमंडळी, हितचिंतक, कलाकार, लेखक, कवी, आणि इतर प्रख्यात व्यक्ती,

पुस्तकांवरचे अभिप्राय भरभरून कळवणारे सहृदयी वाचक, अशा असंख्य व्यक्तींचा समावेश आहे. माझ्या दृष्टीनं तो "पत्रसंग्रह" म्हणजे एक मौल्यवान ठेवाच आहे. फुरसतीच्या क्षणी त्यांच्या पुनर्वाचनातून मिळणारा आनंद अवर्णनीयच असतो.

त्यापैकी ज्या पत्रांचा आवर्जून उल्लेख करता येईल अशी पत्रे म्हणजे:

- मोठमोठे साहित्यिक: (पु ल देशपांडे, व पु काळे, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, रमेश मंत्री, माधव कानिटकर, वसंत पोतदार इत्यादी)

- कलावंत/गायक: (पंडित जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, रामदास कामत, श्रीमती शोभा जोशी, प्रभुदेव सरदार, अरुण दाते, चित्रकार SM पंडित, श्रीनिवास खळे, सी रामचंद्र, बाबासाहेब पुरंदरे, रामदास पाध्ये)

- पुस्तकांवर आलेले विशेष अभिप्राय: नीलकंठ कल्याणी, नगरवाला प्रशालेचे प्राचार्य श्री नगरवाला, श्रीमती पुष्पाताई हिरे, मुकुंदराव किर्लोस्कर (स्त्री, किर्लोस्कर आणि मनोहर मासिकाचे संपादक,) निवृत्त उपायुक्त श्रीनिवास पाटील, पत्रकार अरुण खोरे आणि इतर अनेक मान्यवर. त्याव्यतिरिक्त, कॅन्सररुग्ण आणि त्यांचे नातेवाईक

यांनी लिहिलेली, मनाला खोलवर जाऊन भिडणारी किंवा अस्वस्थ करणारी असंख्य पत्रे.

अशा पत्रांच्या संग्रहातील तीन पत्रे, निव्वळ उदाहरणादाखलचे नमूने म्हणून येथे देत आहे:

- व पु काळे, हे उत्तम लेखक आणि विशेषत: अप्रतिम पत्रलेखक असल्यामुळे, त्यांची पत्रे म्हणजे सर्वांना फार मोठी पर्वणीच वाटे. त्यातून त्यांचे हस्ताक्षरही अतिशय सुंदर होते. त्यांच्याच हस्ताक्षरातल्या पत्राचा हा नमूना (आणि माझ्या डायरीत नोंदवून ठेवलेले, त्यांच्या पत्राला मी धाडलेले उत्तर).

वपु.
३०/मे/१९७८

प्रिय सरोज

पुण्याहून मुंबअीपर्यंतचा एकशेवीस मैलांचा प्रवास चार तासात संपवून घरी पोहोचलो.

परदेशात हाच प्रवास एकशेवीस मिनिटात झाला असता असा विचार करीत बेल वाजवली.

आणि तुझ्या पत्रानं स्वागत केलं.

भारतातल्या पाच-सहा छोट्या पत्रांत, एक अुंच आणि वेलबुट्टीचं पाकिट पाहूनच कोणत्यातरी अिम्पोर्टेड मित्राचं पत्र आहे, हे मी अोळखलं.

पण तुझं पत्र असेल, ही मात्र अपेक्षा नव्हती.

अक्षर अोळखीचं होतं.

पानातल्या आवडत्या पदार्थाचा घास जसा आपण शेवटी राखून ठेवतो, तसं तुझं पत्र शेवटी ठेवलं.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी, म्हणजे आत्ता - 'पंच पंच अुषःकाले' याने, ठीक सुबह साडेसात बजे, तुला अुत्तर लिहायला बसलो.

सकाळी सकाळी ह्या मुंबअीत घाम फुटावा अितकं छान अुकडत आहे.

ह्या मुंबअीच्या निसर्गदत्त हवेपायी, 'घाम गाळेपर्यंत' मर-मर- मरतो, असं एकालाही म्हणता येत नाही.

ह्या संदर्भात देखिल परदेश आठवतो.

'परदेश' हा शब्द मी केवळ, चुकीचा सराव अंगवळणी पडल्यामुळे वापरला.

ज्या देशाची वारी करताना, खरोखरचा घाम फुटतो

त्याला परदेश म्हणतात.
पण, एक वारी (आणि बहुतेक शेवटची) केल्यावर तिथं एवढे आप्त भेटले की त्या संदर्भात तो आता 'परदेश' राहलेला नाही.
तुझ्या पत्रात तू म्हणतेस की आम्ही वावटळीसारखे आलो आणि गेलो.
पण सरोज, आमची वावटळ थिथं परत आली नाही.
मला थितर पाच मंडळींबद्दल माहित नाही.
माझ्या स्वतः बद्दल विचारशील तर ही वावटळ कायम एक व्यथेचा सूर घेऊन मायदेशी परतली आहे.
गारांच्या गावं, वावटळीपायी उध्वस्त झालेली अनेकांनी पाहली असतील.
कारण अशा प्रदेशांची छायाचित्रे निघू शकतात.
पण, तुला जर वावटळच उध्वस्त झालेली पहायची असेल, तर तू तुझ्या 'हे' बरोबर आणि मुलांबरोबर भारतात ये आणि मला बघ.
मी दुःखात आहे का?
मुळीच नाही.
जेवणीखाणी, मित्रमंडळी, हास्यविनोद, रोजची कामे-विवंचना, कथाकथन-लेखन इ॰ सगळं तसंच चालू आहे.
समृध्द जीवनाच्या सर्व संकेतांनी परिपूर्ण असं आयुष्य मी जगतोच आहे.
पण तरी मी हरवलेला आहे.
ह्याचे कारण मला सापडलेले आहे.
उपाय सापडलेला नाही.

पूर्णत्वासंबंधी प्रत्येक व्यक्तीच्या काही ना काही कल्पना असतात.
त्याच्या अभिरुचींची वाढ, त्याच्या पूर्णत्वाच्या कल्पनेच्या दिशेनं होत असते.
तशाच माझ्या काही कल्पना होत्या.
कल्पना म्हणण्यापेक्षा, अपेक्षा होत्या.
व्यावहारीक, व्यावसायिक, सामाजिक, ह्या स्तरावर जशा काही अपेक्षा होत्या,
तशाच त्या माणुसकी, भावनात्मक, कलात्मक आणि निर्मितीसाठी जे जे जरूरीचे असतं, अशा सर्व स्तरांवरच्या होत्या.
ऐहिक सुखाला, उपभोगाला त्यात भरपूर वाव होता.
पंचेंद्रियांच्या आधारावरच जोपर्यंत ह्या देहाचा प्रपंच उभा आहे, तोपर्यंत पंचेंद्रियांना हवंहवंसं वाटणारं कोणतंही सुख मी गौण मानलेलं नाही. ते तसं मानणं हासास्पद ढोंग नाही.
ह्याच भावनेतून लंडन, अमेरिका ह्या देशांनी मला फार हलवं बनवलं आहे.
एक माणूसच हे अवाढव्य निर्माण करू शकतो.
निसर्गाला स्वतःच्या कष्टाचा, कल्पकतेचा दागिना चढवू शकतो, हे दर्शन जितकं विलोभनीय होतं तितकेच अंतर्मुख करणारे होतं.
पण त्याचवेळेला, हेही खरं, की हे सगळं सुंदर का वाटलं?
तर तुम्ही सगळे सुंदर होतात म्हणून.
भारताचं वेड घेऊन तुम्ही सगळे इकडे आलात आणि मी तिकडे स्थायिक झालो, तर तोच देश, तोच

परिसर मला स्मशानवत् वाटेल.
तुम्ही इथं येऊन स्थायिक झालात तर, मनात येईल तेव्हा सरोजला, किंवा माधव-रवी-रामदास-जयू ह्यांना भेटता येतंय ह्याचा आनंद वाटेल, पण तरीही देव्हाऱ्याशिवाय मूर्ती जशी वाटेल, तसंच ते वाटेल.
तुमच्या सर्वांच्या व्यक्तिमत्वात, आपलेपणात, जिव्हाळ्यात, लंडन-अमेरिकेच्या पार्श्वभूमीचा खूप मोठा हिस्सा आहे.
त्या सर्वांसकट तुम्ही आहात
आणि
माझ्यापासून फार फार लांब आहात.

इतकं सगळं लिहूनही, मी सगळं लिहू शकलोय की नाही, हे मला समजत नाही. तुम्हा मंडळींना पत्र लिहितानाही, मी हरवलेला असतो.
एका अनामिक हुरहुरीनं वेढलेला असतो.
माझ्या मन:स्थितीचा मलाच मागोवा घेता येत नाही.
कधी कधी असं वाटतं,
'at any cost' पुन: एकवार लंडनची वारी करावी.
सुखाचा पाठपुरावा जाणिवेनं करता येण्यातलं सुख अपूर्व असतं. सर्व संवेदनांसहित सुखाला भिडता आला तर अतृप्ती राहणार नाही.
परदेशातील पहिल्यावहिल्या भेटीत, संमोहनावस्था इतकी जबरदस्त होती की त्यापायी संवेदना आणि अनुभव ह्यात एक दुरावा होता, एक तलम आवरण होतं.
ते आवरण अति तलम होतं. म्हणून दिसलं खूप

पण स्पर्श कधीच झाला नाही.
आश्चर्यचकित होणं, मुग्ध होणं, ह्याचा मनावर एक
जबरदस्त पगडा होता.
एखादी लाट तडाखा देऊन चिंब करते आणि
ओघळत्या सुखाचा स्पर्श होईतो होईतो, लोप जाते.
एक लाट आली होती ह्या आठवणीपलिकडे मागं
काही स्मरत नाही, तसं माझं ह्या वारीत झालं.
मंदिराची शिखरं दिसली.
मूर्ति दिसली नाही.
जाणिवा जाग्या झाल्या तर मी स्वपुरीत परतलेला.

आता तुमची पत्रं येतात.
एखादा फोटो बघतो.
आणि सगळं शरीर, संवेदना बंड पुकारतात.

हे पत्र लिहिताना, तुम्ही सगळे अवतीभवती होतात.
नवाचा भोंगा वाजतोय्.
त्यानं मी पुन: जमिनीवर आलोय्.
कामावर जायला हवं.

'आप जो पास आ बैठे,
हम जमानेसे दूर जा बैठे.'

सर्वांना नमस्कार

तुमचा,

३०/मे/१९७९

प्रिय सरोज

पुण्याहून मुंबईपर्यंतचा एकशेवीस मैलांचा प्रवास चार तासात संपवून घरी पोहोचलो.

परदेशात हाच प्रवास एकशेवीस मिनिटात झाला असता असा विचार करीत बेल वाजवली.

आणि तुझ्या पत्रानं स्वागत केलं.

भारतातल्या पाच-सहा छोट्या पत्रात, एक उंच आणि वेलबुट्टीचं पाकीट पाहूनच कोणत्या तरी इंपोर्टेड मित्राचं पत्र आहे, हे मी ओळखलं.

पण तुझं पत्र असेल ही मात्र अपेक्षा नव्हती. अक्षर ओळखीचं होतं.

पानातल्या आवडत्या पदार्थाचा घास जसा आपण शेवटी राखून ठेवतो, तसं तुझं पत्र शेवटी ठेवलं.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी, म्हणजे आत्ता, -- "पंच पंच उष:काले" याने ठीक सुबह साडेसात बजे, तुला उत्तर लिहायला बसलो.

सकाळी सकाळी ह्या मुंबईत घाम फुटावा इतकं छान उकडत आहे. ह्या मुंबईच्या निसर्गदत्त हवेपायी "घाम गाळेपर्यंत" मर-मर-मरतो, असं एकालाही म्हणता येत नाही. त्या संदर्भात देखील परदेश आठवतो.

"परदेश" हा शब्द मी केवळ, चुकीचा सराव अंगवळणी पडल्यामुळे वापरला.

ज्या देशाची वारी करताना, खरोखरचा घाम फुटतो त्याला परदेश म्हणतात.

पण, एक वारी (आणि बहुतेक शेवटची) केल्यावर तिथं एवढे आप्त भेटले की त्या संदर्भात तो आता "परदेश" राह्यलेला नाही.

तुझ्या पत्रात तू म्हणतेस की आम्ही वावटळीसारखे आलो आणि गेलो.

पण सरोज, आमची वावटळ इथं परत आली नाही. मला इतर पाच मंडळींबद्दलमाहीत नाही. माझ्या स्वत:बद्दल विचारशील तर ही वावटळ कायम एक व्यथेचा सूर घेऊन मायदेशी परतली आहे.

गावंच्या गावं, वावटळीपायी उध्वस्त झालेली अनेकांनी पाहिली असतील.

कारण अशा प्रदेशांची छायाचित्रं निघू शकतात. पण, तुला जर वावटळच उध्वस्त झालेली पहायची असेल, तर तू तुझ्या "हें" बरोबर आणि मुलाबरोबर भारतात ये आणि मला बघ.

मी दु:खात आहे का? मुळीच नाही. जेवणीखाणी, मित्रमंडळी, हास्याविनोद, रोजची कामं-विवंचना, कथाकथन-लेखन ई. सगळं तसंच चालू आहे.

समृद्ध जीवनाच्या सर्व संकेतांनी परिपूर्ण असं आयुष्य मी जगतोच आहे.

पण तरी मी हरवलेला आहे.

ह्याचं कारण माला सापडलेलं आहे.

उपाय सापडलेला नाही.

पूर्णत्वासंबंधी प्रत्येक व्यक्तीच्या काही ना काही कल्पना असतात.

त्याच्या अभिरुचींची वाढ, त्याच्या पूर्णत्वाच्या कल्पनेच्या दिशेनं होत असते.

तशाच माझ्या काही कल्पना होत्या.

कल्पना म्हणण्यापेक्षा, अपेक्षा होत्या.

व्यावहारीक, व्यावसायिक, सामाजिक, ह्या स्तरावर जशा काही अपेक्षा होत्या,

तशाच त्या माणुसकी, भावनात्मक, कलात्मक आणि निर्मितीसाठी जे जे जरूरीचं असतं, अशा सर्व स्तरांवरच्या होत्या.

ऐहिक सुखाला, उपभोगाला त्यात भरपूर वाव होता. पंचेंद्रियांच्या आधारावरच जोपर्यंत ह्या देहाचा प्रपंच उभा आहे, तोपर्यंत पंचेंद्रियांना हवंहवंसं वाटणारं कोणतंही सुख मी गौण मानलेलं नाही. ते तसं मानणं हयासारखं ढोंग नाही. ह्याच भावनेतून लंडन, अमेरिका ह्या देशांनी मला फार हळवं बनवलं आहे.

एक माणूसच हे अवाढव्य निर्माण करू शकतो. निसर्गाला स्वत:च्या कष्टाचा, कल्पकतेचा दागिना चढवू शकतो, हे दर्शन जितकं विलोभनीय होतं तितकंच ते अंतर्मुख करणारं होतं.

पण त्याचवेळेला, हेही खरं, की हे सगळं सुंदर का वाटलं?

तर तुम्ही सगळे सुंदर होतात म्हणून.

भारताचं वेड घेऊन तुम्ही सगळे इकडे आलात आणि मी तिकडे स्थायिक झालो, तर तोच देश, तोच परिसर मला स्मशानवत वाटेल.

तुम्ही इथं येऊन स्थायिक झालात तर मनात येईल तेव्हा सरोजला, किंवा माधव-रवी-रामदास-जयू ह्यांना भेटता येतंय याचा आनंद वाटेल, पण तरीही देव्हाऱ्याशिवाय मूर्ती जशी वाटेल तसच ते वाटेल.

तुमच्या सर्वांच्या व्यक्तिमत्वात, आपलेपणात, जिव्हाळ्यात, लंडन-अमेरिकेच्या पार्श्वभूमीचा खूप मोठा हिस्सा आहे.

त्या सर्वांसकट तुम्ही आहात आणि माझ्यापासून फार फार लांब आहात.

इतकं सगळं लिहूनही , मी सगळं लिहू शकलोय की नाही, हे मला समजत नाही. तुम्हा मंडळींना पत्र लिहितानाही, मी हरवलेला असतो.

एका अनामिक हुरहुरीनं वेढलेला असतो.

माझ्या मनस्थितीचा मलाच मागोवा घेता येत नाही. कधी कधी असं वाटतं,

"at any cost" पुन्हा एकवार लंडनची वारी करावी. सुखाचा पाठपुरावा जाणिवेनं करता येण्यातलं सुख अपूर्व असतं.

सर्व संवेदनांसाहित सुखाला भिडता आला तर अतृप्ती राहणार नाही.

परदेशातील पहिल्यावहिल्या भेटीत, संमोहनावस्था इतकी जबरदस्त होती की त्यापायी संवेदना आणि अनुभव ह्यात एक दुरावा होता, एक तलम आवरण होतं.

ते आवरण अति तलम होतं. म्हणून दिसलं खूप पण स्पर्श कशालाच झाला नाही.

आश्चर्यचकित होणं, मुग्ध होणं, ह्याचा मनावर एक जबरदस्त पगडा होता.

एखादी लाट तडाखा देऊन चिंब करते आणि ओघळत्या सुखाचा स्पर्श होईतो होईतो, लांब जाते.

एक लाट आली होती ह्या आठवणीपलीकडे मागे काही उरत नाही, तसं माझं या वारीत झालं. मंदिराची शिखरं दिसली. मूर्ति दिसली नाही. जाणिवा जाग्या झाल्या तर मी झपूर्झात परतलेला.

आता तुमची पत्रं येतात. एखादा फोटो बघतो. आणि सगळं शरीर, संवेदना बंड पुकारतात.

हे पत्र लिहिताना, तुम्ही सगळे अवतीभंवती होतात.

नवाचा भोंगा वाजतोय - त्यानं मी पुन्हा जमिनीवर आलोय. कामावर जायला हवं.

“ आप जो पास आ बैठे,

हम जमानेसे दूर जा बैठे.”

सर्वांना नमस्कार.

तुमचा

वपु काळे

●व पू काळेंच्या वरील पत्राला मी लिहिलेलं उत्तर.

७ ऑगस्ट १९७९

प्रिय वपु,

तुमचं पत्र मिळालं.
इतकं नीटनेटकं पाकीट बघण्याची संवय नसल्यानं,
लगेच फोडण्याची इछा होईना.
पण शिंपला उघडल्याशिवाय आतले मोती दिसत नाहीत.
शिंपला उघडला आणि सुंदर शब्दमोत्यांची उधळण झाली.
पत्र अनेक वेळा वाचलं. मीच नव्हे तर आणखीही कित्येक लोकांनी.

सुंदर कलाकृती सर्वांनाच विलोभनीय वाटते.
पण प्रत्येकाचा आनंद त्याच्यापुरताच मर्यादित असतो म्हणून बरं!
मजकुरातील व्यथेच्या वेदनेनं सगळेच भारावले- मी मात्र हरवले-
मागील वर्षीच्या भूतकाळात !
तुम्ही लोक परदेशच्या आठवणी काढता.
आणि आम्ही लोक मायदेशी परतण्याची भाषा बोलतो.
दोन्ही गोष्टी परस्परविरोधी पण त्यामागील व्यथा एकच।
एक भूतकाळाची तर दुसरी भविष्याची.
कधी वावटळी उध्वस्त होतात तर कधी गावं !

पण परिणाम मात्र तोच- आयुष्यातून निसटलेल्या क्षणांचा अर्थ शोधण्याची "न" संपणारी धडपड करण्याचा.

इतक्या लगेच मी कधीच कुणाला उत्तर लिहू शकत नाही.

पण या उत्तरामागे मात्र स्वार्थ आहे.

तुमच्यासारख्या साहीत्यिकांची- नव्हे "**शब्दांच्या सम्राटांची**" पत्रं म्हणजे मेजवानीच.

नुसता शेवट्ला घासच गोड नव्हे तर पूर्ण जेवणही!

परदेशच्या अल्पशा भेटीत तुम्ही जे पहिलंत, अनुभवलंत, ते वर्षानुवर्षे इथं राहूनही आम्ही पाहू शकलो नाही, याचं वाईट वाटतं. पण ती "दृष्टी" मुद्दाम आणून येत नाही, उपजतच असावी लागते.(नाहीतर आम्ही सुद्धा तुमच्यासारखेच प्रथितयश लेखक नसतो कां झालो?

तुम्ही शिफारस केलेल्या- रामदास आणि चंदू पाध्ये-बंधूंचा सहवास आम्हाला चार दिवस लाभला.

दोघे भाऊ अतिशय सालस आणि गुणी आहेत.चारच दिवसांच्या परिचयात दृढ मैत्री निर्माण करून परतले. त्या दोघांबरोबर अर्थातच तुम्हा सर्वांच्या आठवणीही अवती- भवती वावरत होत्याच.

सुधीर मोघेंची कविता तुमचे तोंडून दोनदा ऐकण्याचा योग आला.

पण आठवणी प्रतिकात्मक असतील, तर मला आठवते ती "ललत" च्या पार्श्वभूमीवर ऐकलेली.

नुकतीच तुमची **"भूलभुलैया"** आणि **"पार्टनर"** ही पुस्तकं वाचून पूर्ण केली०

त्याबद्दल आत्ताच लिहीत नाही. कारण ते एक स्वतंत्र पत्र होईल.

आम्हा लोकांना भाषेच्या आणि लेखनाच्या अडचणींमुळे, मजकूर पुरवून पुरवून वापरावा लागतो.

मात्र “पार्टनर” तुमच्याबद्दल खूप काही बोलला – प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षही !

तुमच्या पत्रातील व्यथेच्या सुरांशीही आपोआप धागे जुळले त्याचे.

आयुष्यात खूप काहीतरी मिळवण्याची धडपड करणाऱ्या महत्वाकांशी मनाची व्यथा, मी उत्तम प्रकारे जाणू शकते.

मी पण त्या व्यथेनं, लहानपणापासूनच पछाडले आहे.

कारणं सापडतात पण इलाज सापडत नाहीत.

तुमच्यासाठी सलामत अलींच्या एका मैफिलीचं ध्वनिमुद्रण पाठवलं आहे. आवडेल अशी आशा आहे.

सलामत अलींना तानपुऱ्यावर साथ करण्याची सुवर्णसंधी मला दोन वर्षांपूर्वी प्राप्त झाली होती.

फार मुलायम आवाज आहे त्यांचा.

अरुण दातेंकडे मेहदी हसन साहेबांच्या गझलांच्या कॅसेट्स करून पाठवल्या आहेत. शक्य झाल्यास त्या देखील जरूर ऐका. त्यातील “दिले नादान तुझे हुवा क्या है " ही माझी अत्यंत आवडती गझल.

माझ्या जीवनात संगीताला फार मोठं स्थान आहे.

अर्थात उत्कृष्ट संगीत ऐकण्यानं मिळणाऱ्या-

उत्कट आनंदाची अनुभूति तुम्हाला वर्णन करून सांगण्याची जरूरी नाहीच.

तुम्ही स्वतःच थोर कलावंत आहात. तुमच्या पत्रावरून तुम्ही पुन्हा लवकरच परदेशची वारी करणार याबद्दल शंकाच वाटत नाही.

जाग्या झालेल्या जाणीवांना नक्कीच खूप काही अनुभवायचं असणार. आमच्या जाणीवा मात्र नेहमीच दीर्घ निद्रेत असतात. त्यामुळे सहज स्पर्श करून गेलेले आनंदाचे क्षण सुद्धा, सहजासहजी जाणवत नाहीत! परदेशींच्या अनुभवातून नवं काय काय जन्माला आलं? जाणून घेण्याची उत्कंठा आहे.

पत्रोत्तर तुमच्या "स्टाइल" मधे लिहिलं म्हणून राग मानू नका. कारण कल्पकता वापरण्यापेक्षा-

"अनुकरण" करणं सोपं असतं. त्यातून तुमच्यासारख्या प्रतिभावंत लेखकाचं अनुकरण तर काय, अनेकांना करावसं वाटतं.

खूप लिहिलं आणि काहीच लिहिलं नाही. (पुन्हा तीच व्यथा !)

नील आणि त्याचे बाबा सध्या भारतातच आहेत. मागील आठवड्यात अरुण दातेंकडे नीलचा वाढदिवस साजरा झाला. (मी फक्त फोटोतच पहिलं).

एकटेपणामुळे मला मात्र सध्या विचार करायला भरपूर वेळ मिळतो आहे. त्या विचारांमधून-काहीतरी लिखणानं आकार घ्यावा असं उगीचच वाटतय! पण कल्पनांचे पक्षी सत्याच्या बाणानं नेहमीच घायाळ होतात. तेंव्हा मुळातच नसलेली प्रतिभा आणणार तरी कुठून ?

वसुंधराताईंना मनापासून आठवण आणि खूप खूप शुभेच्छा.

सरोज

●प्रसिद्ध गायिका श्रीमती शोभा जोशी यांचे एक नमुन्याचे पत्र:
(माझ्या पत्राला त्यांनी धाडलेलं उत्तर)

Shobha Joshi

C/o. S. G. Joshi
1586, Tilak Road,
Poona 411 030.

C/o. P. K. Dhamdhere
169-C Purandare Park
Hindu Colony,
Bombay 400 014.

Phone
Bombay Office : 231231
Resi. : 441073

17th Oct. 1979
Bombay.

प्रीय सौ. सरोजताई
सप्रेम नमस्कार.

तुमचे अतिशय सुरेख अक्षरातील सुरेख पत्र मी स्वित्झर्लंडहून आल्यावर मिळाले. परंतु त्याचे उत्तर मात्र मी खूपच उशीरा देत आहे त्याबद्दल क्षमस्व. उशीर होण्याच्या अनेक कारणांत एक कारण - म्हणजे तुमचे मोत्यांहून छान अक्षर. त्यामुळे मला फारच लाज वाटत होती पत्र लिहायची - कारण माझं अक्षर फार वाईट आहे. असो.

माझ्या सारख्या नव-कलावंताचं तुम्ही जे कौतुक केलं आहेत, त्याबद्दल धन्यवाद. तुमच्यासारख्या रसिकांकडून मिळणारं प्रेम, दाद, कौतुक हीच आमची खरी संपत्ती. तुमचे असेच प्रेम सदैव लाभो, हीच इच्छा.

तुमच्या अक्षराप्रमाणेच, तुमची कविताही खूप छान आहे. मी किंवा माझं गाणं कवितेचा विषय बनू शकेल, असं कधी वाटलं नव्हतं. परदेशांत राहूनसुद्धा मराठी भाषेवरचं तुमचं प्रभुत्व वाखाणण्याजोगं आहे. कवितेतील कांही उपमा फार सुरेख आहेत. तुमचं संगीतातील ज्ञान पण त्यातून कळते. खरंच तुम्ही सर्व-गुण संपन्न आहात.

डिसेंबरमध्ये किंवा जेव्हां कधी भारतात याल तेव्हां


आपण जरूर भेटू. महफिल असेल तरच भेटायचं असं नाही हं.
नसली तरी आपण भेटू.

B.B.C. ला मी पुन्हा गायले आहे, ते तुम्हाला
यथावकाश ऐकायला मिळेलच. माझ्या कार्यक्रमाचं समीक्षण तुम्ही
कुठल्याही मासिका करिता लिहीणार असाल तर माझी हरकत
नाही, उलट मला आवडेलच. अण्णांनीही (C. Ramchandra)
तुमचे पत्र आल्याचं मला सांगितलं.

तुमच्या सारख्या रसिकांशी मैत्री सतत लाभो, हीच
पुन्हा एकदा इच्छा.

श्री. सहस्रबुद्ध्यांना माझा नमस्कार व मुलांना
आशीर्वाद. सवड मिळेल तेव्हां पत्र लिहाल कां?
दिवाळी सर्वांना सुखाची जावो!

आ.

शोभा जोशी

17th Oct 1979

Bombay

प्रिय सौ सरोजताई

सप्रेम नमस्कार

तुमचे अतिशय सुरेख अक्षरातील सुरेख पत्र मी स्वित्झर्लंडहून आल्यावर मिळाले. परंतु त्याचे उत्तर मात्र मी खूपच उशीरा देत आहे त्याबद्दल क्षमस्व. उशीर होण्याच्या अनेक करणात एक कारण – म्हणजे तुमचे मोत्यांहून छान अक्षर - त्यामुळे मला फारच लाज वाटत होती पत्र लिहायची - कारण माझं अक्षर फार वाईट आहे. असो.

माझ्यासारख्या नव–कलावंताचं तुम्ही जे कौतुक केलं आहेत, त्याबद्दल धन्यवाद. तुमच्यासारख्या रसिकांकडून मिळणारं प्रेम, दाद, कौतुक हीच आमची खरी संपत्ती. तुमचे असेच प्रेम सदैव लाभो, हीच इच्छा.

तुमच्या अक्षराप्रमाणेच, तुमची कविताही खूप छान आहे. मी किंवा माझं गाणं कवितेचा विषय बनू शकेल, असं कधी वाटलं नव्हतं. परदेशात राहूनसुद्धा मराठी भाषेवरचं तुमचं प्रभुत्व वाखाणण्याजोगं आहे. कवितेतील काही उपमा फार सुरेख आहेत. तुमचं संगीतातील ज्ञान पण त्यातून कळते. खरंच तुम्ही सर्व- गुण संपन्न आहात.

डिसेंबरमध्ये किंवा जेंव्हा कधी भारतात याल तेंव्हा आपण जरूर भेटू. महफिल असेल तरच भेटायचं असं नाही हं. नसली तरी आपण भेटू.

***B.B.C** ला मी पुन्हा गाईले आहे, ते तुम्हाला यथावकाश बघायला मिळेलच. माझ्या कार्यक्रमाचं समीक्षण तुम्ही कुठल्याही मासिका करिता लिहिणार असाल तर माझी हरकत नाही, उलट मला आवडेलच. अण्णांनीही (**C.Ramchandra**) तुमचे पत्र आल्याचं मला सांगितलं. तुमच्या सारख्या रसिकांची मैत्री सतत लाभो, हीच पुन्हा एकदा इच्छा.*

श्री सहस्त्रबुद्धे यांना माझा नमस्कार व मुलाला आशीर्वाद. सवड मिळेल तेंव्हा पत्र लिहाल का?

दिवाळी सर्वांना सुखाची जावो!

आ.

शोभा जोशी

●डॉ नीळकंठ कल्याणी यांचा **"कॅन्सर आणि आपण"** या माझ्या पुस्तकावरचा अभिप्राय:



डॉ. नीलकंठ आ. कल्याणी

पुणे ४११०१४ (महाराष्ट्र)

१८ जुलै, २०१०

मित्र डॉ. सहस्रबुद्धे,

स. न. वि. वि. आपले दि. १५ जुलैचे पत्र व सोबत पाठविलेले कर्करोगावरील पुस्तक पोचले. त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

आरोग्याविषयक लिखाण हे बहुतांशी क्लिष्ट असते. तथापि, आपल्या पुस्तकातील ओघवत्या व सोप्या भाषेमुळे आणि विषयाच्या सुसंबंध मांडणीमुळे ते वाचनीय झाले आहे. किंबहुना, ज्या ज्या व्यक्तींच्या समोर हे पुस्तक येईल, त्यांना या विषयात ते अरसिक असले तरी, वाचण्यासाठी आकृष्ट करील, असे माझे हे पुस्तक वाचल्यानंतर झालेले वैयक्तिक मत आहे.

कर्करोग आणि त्याला आळा घालणे किंवा त्याचे पुनः निर्मूलन करणे ही डॉक्टर्स आणि कर्करोगी यांचीच फक्त समस्या आता उरली नसून, तीने सामाजिक दृष्ट्या सुद्धा गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्या पार्श्वभूमीवर, सामान्यांपर्यंत त्यांच्या भाषेत जाऊन परिणामकारक रीत्या मार्गदर्शन करण्याचे आपले हे कार्य उल्लेखनीय आहे. या सेवाकार्यास माझ्या आपणास अनेक हार्दिक शुभेच्छा!

—२.

डॉ. नीलकंठ आ. कल्याणी

पार्वती निवास
डी. कल्याणी
पुणे ४११ ०१४ (महाराष्ट्र)

– 2 –

आमच्या उद्योगसमूहामधील कामगारांना कर्करोगाविषयी ही स्वच्छ आणि सोपी माहिती उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल. त्यासाठी, या पुस्तकाच्या पन्नास प्रती आमच्या ग्रंथालयात ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. याबाबतीत लवकरच संबंधित अधिकारी आपणाशी संपर्क साधतील.

आपणाशी ओळख-परिचय होण्याचा सुयोग आपण जवळच रहात असलेने लवकरच येईल यात शंका नाही. मी आजच दोन-तीन दिवसांसाठी बाहेरगावी जात आहे आणि बहुतेक येत्या आठवड्यात परदेशी जाणार आहे. तथापि परत आल्यानंतर आपल्या सोयीनुसार भेट घ्या. कळावे,

आपला

नीलकंठ आ. कल्याणी

डॉ. सरोज सहस्रबुद्धे
'सानिआरा' अपार्टमेंट्स
कल्याणीनगर, येरवडा
पुणे ४११ ०१४.

प्रिय डॉ सहस्रबुद्धे,

स.न.वि.वि. आपले दि. १७ जुलैचे पत्र व सोबत पाठविलेले कर्करोगावरील पुस्तक पोचले. त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

आरोग्य-विषयक लिखाण हे बहुतांशी क्लिष्ट असते. तथापि, आपल्या पुस्तकातील ओघवत्या व सोप्या भाषेमुळे आणि विषयाच्या सुसंबद्ध मांडणीमुळे ते वाचनीय झाले आहे. किंबहुना, ज्या ज्या व्यक्तींच्या समोर हे पुस्तक येईल, त्यांना या विषयात ते अरसिक असले तरी, वाचण्यासाठी आकृष्ट करील, असे माझे हे पुस्तक चाळल्यानंतर झालेले वैयक्तिक मत आहे.

कर्करोग आणि त्याला आळा घालणे किंवा त्याचे पूर्णत: निर्मूलन करणे ही डॉक्टर्स आणि कर्करोगी यांचीच फक्त समस्या आता उरली नसून, तिने सामाजिकदृष्ट्या सुद्धा गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्या पार्श्वभूमीवर, सामान्यांपर्यंत त्यांच्या भाषेत जाऊन परिणामकारकरित्या मार्गदर्शन करण्याचे आपले हे कार्य उल्लेखनीय आहे. या सेवकार्यात माझ्या आपणाला अनेक हार्दिक शुभेच्छा!

आमच्या उद्योगसमूहामधील कामगारांना कर्करोगावरील ही सरळ आणि सोपी माहिती उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरेल. त्यासाठी, या पुस्तकाच्या पन्नास प्रती आमच्या ग्रंथालयात ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. याबाबतीत लवकरच संबंधित अधिकारी आपणाशी संपर्क साधतील.

आपणाशी ओळख-परिचय होण्याचा सुयोग आपण जवळच रहात असलेने लवकरच येईल यात शंका नाही. मी आजच दोन-तीन दिवसांसाठी बाहेरगावी जात आहे. आणि बहुतेक येत्या आठवड्यात परदेशी जाणार आहे. तथापि परत आल्यानंतर आपल्या सोयीनुसार भेटू या. कळावे.

आपला

नीळकंठ आ. कल्याणी

●जुन्या फोटोंसारखीच जुनी पत्रंसुद्धा, ताजेपणाचा प्रत्यानंद दिल्याशिवाय रहात नाहीत. पण आजच्या मोबाईल-संगणकांच्या जमान्यात-स्वहस्ताक्षरात लिहिली गेलेली पत्रं दुर्मिळच! त्यामुळे हा छंदही हळूहळू इतिहासजमाच होणार की काय, याची भीती वाटते. आणि काहीशी खंतही!

परिपूर्ण जीवन

“तुमच्या जीवनात अधिक सजीवता आणा,”
“जगण्याचा आनंद लुटा,”
“सकारात्मक आशावादी आयुष्य जगा.”

असे आणि अशा प्रकारचे शब्दप्रयोग आपण वारंवार ऐकत असतो, वाचत असतो. पण खऱ्या अर्थी परिपूर्ण जीवन म्हणजे नक्की काय याचा फारसा विचार आपण क्वचितच करतो. मात्र तसा विचार करण्यासाठी थोडी सवड हवी, शांतता हवी, मनाची एकाग्रता व्हायला हवी आणि मगच पुढं जायला हवं.

आता सरासरी आयुर्मर्यादा बरीच वाढली आहे. आपल्या माहितीमधल्या कितीतरी लोकांनी नव्वदी पार केल्याचं आपण वारंवार ऐकतो. शताब्दी गाठणं सुद्धा अगदीच दुर्मिळ राहिलेलं नाही. तरीही जीवनामधला महत्वाचा काळ, आणि वर्षे आपण किती सुखानं, आनंदानं, आरोग्यदृष्ट्या समाधानानं जगतो, हे देखील तितकंच महत्त्वाचं आहे. त्यासाठीच वारंवार आयुष्याचं सिंहावलोकन करून, खऱ्या अर्थी परिपूर्ण आणि उपयुक्त जीवन आपण जगतो आहोत का आणि यापुढेही जगणार आहोत ना, हा सवाल साधारण चाळीशी ते पन्नाशीच्या आसपासच प्रत्येकानं स्वतःला विचारायला आरंभ केला पाहिजे.

आयुष्यातल्या विविध समस्या गृहीत धरून, त्यातूनच योग्य तो मार्ग काढून आपण स्वतःकडे, स्वतःच्या दिनचर्येकडे, जगण्यामधले छोटे छोटे आनंद मिळवण्याकडे (किंवा ते द्विगुणित करण्याकडे) अधिक डोळसपणे लक्ष पुरवायला हवं. दिनचर्येला काहीतरी शिस्त लावून घ्यायला हवी. लहानसहान प्रसंगांमधूनही मोठा आनंद कसा निर्माण करता येईल, यावर अधिक विचार करून, त्यावर लक्ष केंद्रित करायला हवं. अशा रीतीनं, प्रत्येकानंच आपलं जीवन परिपूर्ण आणि रसपूर्ण बनवण्याचा प्रयत्न केला, तर आपल्याबरोबरच, भोवतालच्या आणि कुटुंबामधल्या इतरेजनांचं आयुष्यही त्यामुळे अधिक समृद्ध आणि सुखकर बनेल.

त्यासाठीचा उपाय फारसा अवघड नाही. पण थोडासा मनोनिग्रह जरूर हवा. दिवसभरात केंव्हातरी सोयीप्रमाणे अर्धा तास जर आपण एकांतात बसून शांतपणे, न बोलता चिंतन-मनन करण्यात घालवला, तर त्यामुळे दिवसभराचा मनावरचा ताण हलका करायला खूSप म्हणजे खूSSपच मदत होईल. दिवसभर आपल्याला इतका आवाज, गोंगाट आणि गडबड यांना तोंड द्यावं लागतं- त्याशिवाय,इतक्या असंख्य दैनंदिन-समस्या पुढे ठाकलेल्या असतात, की मन आणि शरीर दोहोंनाही विश्रांती आणि शांती मिळवण्याची नितांत गरज भासते. शहरी वातावरणामधे राहिल्यामुळे, निसर्गापासून तर आपण सारखेच दूर जात आहोत. (लहान घरं, दिवसभर वाजणारा टेलिव्हिजन आणि दूरध्वनीची खणखण, मुलांची गडबड, पाहुणे, येणारे जाणारे, सार्वजनिक उत्सवांचे लाऊड स्पीकर्स आणि इतर असंख्य

गोष्टींमुळे शांतता कुठे आणि कशी हरवते कळतच नाही. तरीही, खऱ्या अर्थानं मनःशांती, शरीरस्वास्थ्य आणि आत्मज्ञान मिळवण्यासाठी, काही काळाच्या एकांताला तरी पर्यायच नाही. जेव्हा आपण एकटे असतो शांत बसलेले असतो, तेव्हाच आयुष्यातल्या चिंता आणि समस्यांवर विचार करायला आणि योग्य ती उत्तरं शोधायला पुरेसा वेळ मिळेल.

त्यासाठीच आपल्या दिनक्रमात नेहमीच कार्यमग्नता आणि विश्रांती (झोप) यांचं योग्य प्रमाण राखण्याचा प्रयत्न करायला हवा. शहरात राहून या क्रिया आपण यंत्रवत् करीत असतो. पण यंत्रालाही अखेर विश्रांती हवी, वंगण हवं. ते जर योग्य प्रमाणात आपण पुरवू शकलो नाही, तर इतर यंत्रांसारखच, शरीरयंत्र आणि मनोयंत्र बिघडायलाही फारसा वेळ लागणार नाही.

बहुसंख्य लोकांच्या बाबतीत असं घडतं की जो आयुष्यक्रम ते जगतात, तो त्यांनी स्वतः निवडलेला नसून, परिस्थितीनं त्यांच्यावर लादलेला असतो. काही लोकांना असा घाईगर्दीचा जीवनक्रम पत्करावाच लागतो (घाईनं जेवण उरकायचं, वाहन मिळवण्यासाठी धावायचं, तासन् तास उभं राहून प्रवास करायचा वगैरे). त्यामुळे बहुसंख्य वेळा स्वतःला काय हवं आहे यापेक्षा आपल्यावर काय लादलं गेलं आहे तेच महत्वाचं ठरतं आणि येऊन पडलेली जबाबदारी पेलता पेलता आवडी- निवडींना पारच मुरड घालावी लागते. अशा रीतीनं, स्वतःसाठी जराही वेळ काढू न

शकणाऱ्या लोकांच्या शरीर-मनावर-एक ना एक दिवस त्याचा परिणाम झाल्याशिवाय रहात नाही.

त्याव्यतिरिक्त, जे लोक चोवीस तास इतर लोकांच्या गराड्यात वावरतात, ज्यांना स्वतःसाठी थोडासाही स्वतंत्र आणि स्वास्थ्याचा वेळ मिळत नाही, ते लोक तर नेहमी दुसऱ्यांच्याच विचारात मग्न असतात. त्यांचं आयुष्य हे सार्वजनिक आयुष्यच बनलेलं असतं. अशा लोकांनीही रोज थोडावेळ तरी स्वतःच्या आत्म्याचा आतला आवाज ऐकण्यासाठी वेळ काढायलाच हवा. अर्धा तास शुद्ध मोकळ्या हवेत किंवा एखाद्या बागेत फेरफटका मारला, तरी मनाचा आणि शरीराचा ताण हलका होतो. आपल्याकडे कितीतरी सार्वजनिक बागांमधे हल्ली योगासनं, व्यायाम, कवायती किंवा हास्यक्लब यांची सोय असते. त्यांचा लाभ घेणं, हे देखील फार मोठं **Relaxation** च आहे.

पूर्वीच्या काळात बहुसंख्य लोकांचा जीवनक्रम हा निसर्गचक्राशी जोडलेला असायचा. निसर्गातल्या प्रत्येका गोष्टीसाठी वेळ ठरलेली असते हे तर आपण प्रत्यक्ष अनुभवतोच. एवढंच नव्हे तर अगदी वनस्पती आणि प्राण्यांमधे सुद्धा, प्रत्येक ऋतूत होणारे बदल, स्पष्टपणे सूचित केले जातात. आपणा माणसांची दिनचर्या मात्र आता यंत्रापेक्षाही अधिक यांत्रिक बनायला लागली आहे. विविध यंत्रे तर आपल्यासाठी राबत असतातच,पण आपण माणसंही आता अक्षरशः यंत्रवत कामं करीत असतो. पण काहीही झालं तरी

निर्जीव यंत्रांचे नियम आपण सजीव माणसांना थोडेच लावू शकणार? आपल्याला शरीर, मन, भावना आणि आत्मा या सर्वांकडेच लक्ष पुरवायचं असतं. वास्तवात, साध्या-साध्या प्राण्यांना सुद्धा, वेळोवेळी विश्रांती आणि शांततेची गरज भासते. मग मनुष्यप्राण्यांचं जीवन तर किती गुंतागुंतीचं आहे. सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक आणि इतर जबाबदाऱ्या पेलताना आपली जी भरड चालू असते, त्याचे दूरगामी अनिष्ट परिणाम शेवटी आपल्याच शरीरावर आणि मनावर आघात करीत असतात. वाढलेला गोंगाट, उंचावलेली ध्वनीची पातळी, धूळ, धुरळा, दूषित हवा या साऱ्यांनी आपण बेजार होत असतो. पण त्यावरचे उपाय साधे सरळ नसतात.

आपल्या ऋषी-मुनींचा वर्षानुवर्षांचा आणि शतकानु-शतकांचा अनुभव होता, की मनाला आणि आत्म्याला शांती मिळवण्यासाठी, एकांतवासासारखा दुसरा पर्याय नाही. (उगीच नाही ते तपश्र्चर्येसाठी, निसर्गसान्निध्यात नाहीतर गुहेत बसणं पसंत करीत.) हल्ली देखील कितीतरी कलावंत, गायक कार्यक्रमाआधी काही काळ मौन पाळतात किंवा दीर्घ प्रार्थनेत मन एकाग्र करतात. शरीरस्वास्थ्यासाठी मन प्रसन्न असणं आणि ठेवणं किती आवश्यक आहे, याचं महत्त्व प्रत्येकालाच पटायला हवं. पाश्चिमात्य देशांमधेही योगासनं आणि ध्यानधारणा **(meditation)** यांची वाढती लोकप्रियता हे त्याचंच द्योतक आहे.

कवी, लेखक, चित्रकार, गायक, वादक आणि शास्त्रज्ञ हे सारे निर्मितीचे शिल्पकार असल्यामुळे,त्यांना तर कुठलीही निर्मिती करण्याआधी, एकाग्रता आणि मनाची शांती अत्यावश्यकच असते.

सध्याच्या धकाधकीच्या आणि यंत्रवत जीवनक्रमामुळे आपण नक्की कोण आहोत, कसं असायला हवं, आपली वैशिष्ट्ये काय, ती कशी टिकवायची वगैरे गोष्टी, आपण थोड्याफार विसरूनच जायला लागलो आहोत. पण शरीर आणि मन जर आक्रोश करून सांगत असतील की “तुला आता थोडी तरी शांततेची आणि स्वास्थ्याची आवश्यकता आहे” तर सर्व माध्यमांकडे आणि इतर अवांतर गोष्टींकडे दुर्लक्ष करून, आपण आपला आतला आवाज ऐकायला हवा आणि त्याची दखल घ्यायला हवी. तो सल्ला जर आपण मानला, तर प्रत्येकाचं जीवन नक्कीच जास्त निरोगी, निरामय सकारात्मक, सोशिक आणि आनंदी बनू शकेल. कटकटी आणि तणावांखाली सातत्यानं दबून जाण्यात किंवा रहाण्यात कोणतं सुख आहे?

जेव्हा आपल्या शरीराला थकवा जाणवतो किंवा मन उदास बनतं, तेव्हा अगदी थोडासा वेळ स्वतःसाठी, शांततेत घालवण्यासाठी काढा आणि मग बघा काय आश्चर्य घडतं ते. अखेर आपण जे आणि जसे आहोत ते- आपल्या सभोवतालच्या वातावरणानं आपल्याला जे काय बनवलं तसे आहोत. पण ते वातावरणच आपण थोडंसं बदललं, त्याला किंचित आपल्या मनासारखा आकार दिला, तर आपण त्या परिस्थितीचे गुलाम बनणार नाही. बारीक बारीक बदलांनीच अखेर एक मोठं सुखद परिवर्तन घडून येतं.

महात्मा गांधींनी अहिंसेचं तत्त्व जगासमोर मांडलं. त्यांचं साधं सोपं तत्त्वज्ञान असंच होतं की, जो मनुष्य प्रथम स्वतःच्या आयुष्यावर ताबा ठेवायला शिकेल, त्याला जीवनामधल्या अवघडात अवघड समस्या सोडवताना देखील कष्ट होणार नाहीत. गांधीजींनी एकांताचं, मनःशांतीचं महत्त्व जाणलं होतं. म्हणूनच त्यांनी आश्रमात रहाण्याचं आणि सुतकताईमधून शांती मिळवण्याचं तत्त्व जगासमोर मांडलं.



तात्पर्य हेच की, **‘परिपूर्ण जीवन’** कसं बनवायचं आणि जगायचं हे आपलं आपणच पूर्णपणे ठरवायला हवं, स्वतःसाठी शोधून काढायला हवं आणि त्यातून आनंद निर्माण करण्याची संवय लावून घ्यायला हवी!

आम्हा भारतीयांच्या परदेशी व्यथा
(१९८२ मधे शब्द-बद्ध केलेल्या)

पंधरा-सोळा वर्ष इंग्लंडसारख्या परदेशात वास्तव्य करून, नुकतेच आम्ही कायमचे मायदेशी परतलो. आयुष्याच्या उभारीचा, तारुण्याचा, उमेदीचा जवळपास सगळाच काळ परदेशात घालवला. इतकी वर्ष खरंच आम्ही तिकडे का राहिलो? नातेवाईक, मित्रमंडळी आणि प्रत्यक्ष आम्हालाही कधीच पुरतं ‘न’ उलगडलेलं ते एक गूढ कोडं आहे. आमच्याप्रमाणेच, शेकडो मराठी कुटुंबं आज इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि युरोपसारख्या प्रगत देशांमधे रहात आहेत आणि त्यापैकी बरेच लोक आता तिथे स्थायिकच झाले आहेत, असंही म्हणायला हरकत नाही. कारण निदान नजिकच्या भविष्यकाळात तरी आपल्या देशात, मातृभूमीवर परतण्याची त्यांची इच्छा नाही.

असं का घडतं? जो जातो तो कालांतरानं तिकडचाच का बनतो? परदेशात राहून आम्ही लोक अधिक सुखी, समाधानी आणि संपन्न बनतो का? आम्हाला परत फिरण्याची इच्छाच होत नाही का? प्रबळ इच्छा असूनही लोक परत का येत नाहीत? या आणि अशा प्रश्नांमधून निर्माण झालेलं, भूतकाळाला लागू होणारं थोडसं विचारमंथन:

परदेशी जाण्याचे उद्देश:

1. आरंभी म्हणजे साधारण १९६० च्या आसपास बरेच लोक उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर, परतलंच पाहिजे अशी आपल्या देशाची किंवा पाश्चिमात्य देशांमधेही त्याकाळी सक्ती नसल्यामुळे, बहुसंख्य लोक परदेशात नोकरी करायला लागले. अनुभव घेणं हा तर त्यामागचा प्रमुख उद्देश होताच, पण हाती पडणाऱ्या भरपूर मोबदल्याचं आकर्षणही जबरदस्त असायचं.

2. केवळ नोकरी करून, तिकडच्या कामाचा अनुभव घेण्यासाठी येणाऱ्या लोकांचा दुसरा वर्ग. त्यात एकेकाळी खूपसे डॉक्टर, इंजिनिअर्स, आर्किटेक्ट, शिक्षक वगैरे पेशांमधल्या लोकांचा समावेश होता. भारत सोडताना बहुतेकांचा, केवळ दोन-तीन वर्षे राहण्याचाच उद्देश असे. पण बऱ्यापैकी पैसा मिळायला लागला, की आपोआपच वाढीव मुक्काम आणि अधिक अनुभव यांचा मोह सोडणं कठीण वाटे. त्यातच गाडी, घर वगैरे खरेदी करून आयुष्याला स्थैर्य आलं, की परतीची इच्छा बोथट बनायला लागे.

3. इतर काही लोक, शिक्षण आणि अर्धवेळ नोकरी अशा दुहेरी हेतूनं येत. बऱ्याच वेळा दोन्ही गोष्टी करणं अवघड ठरत असल्यानं शिक्षणाचं ध्येय लांबणीवर पडून, उदरनिर्वाहासाठी नोकरी करायला प्राधान्य दिलं जाई.

साधारणतः दहा-बारा वर्षे इंग्लंड- अमेरिकेत स्थायिक झालेल्या बहुसंख्य लोकांनी, या तीनपैकीच कोणत्या ना कोणत्या उद्देशानं आरंभी भारत सोडण्याचा निर्णय घेतला.

प्रगत पाश्चात्य देशांमधे जाऊन उच्चशिक्षण घेणं ही महत्त्वाकांक्षा वर्षानुवर्ष आपली लोकप्रियता टिकवून आहे. त्यामागच्या साधारण भूमिका अशा असतः

1. इतरांपेक्षा वेगळं काहीतरी करण्याची जिद्द.
2. आपल्या देशात जो शिक्षणक्रम उपलब्ध नाही त्यासाठी परदेशगमन.
3. परत आल्यानंतर, परदेशी शिक्षण घेऊन येणाऱ्यांना, जास्त चांगल्या आणि पगारदार नोकऱ्या मिळत असत.
4. शिक्षणाबरोबरच, प्रगत देशांमधलं स्वच्छ, समृद्ध जीवन जवळून बघण्याचं आकर्षण.
5. आपल्या हुषारीचं देशात नव्हे तर देशाबाहेर तरी चीज होईल ही आकांक्षा.

वास्तवात, आपल्याकडच्या शिक्षणपद्धतीतही आता नेटकेच नव्हे तर आमूलाग्र बदल झाले आहेत आणि प्रतिवर्षी होत आहेत. बऱ्याच शिक्षणक्रमांसाठी, परदेशी जाण्याची आवश्यकताही भासत नाही. तरी

आजही प्रगत देशांकडे झेप घेण्याचं वेड, नवीन पिढ्यांमधेही कमी झालेलं नाही. बहुतेक तरुण-तरुणींच्या मनात, खोल खोल घर करून बसलेली ती सुप्त महत्त्वाकांक्षा असते. भारतात परतल्यानंतर गेल्या वर्षभरात असंख्य तरुण-तरुणींनी, त्यांची परदेशी जाण्याची इच्छा माझ्याजवळ मोकळेपणी व्यक्त केली. परंतु दुर्दैवानं, सध्याच्या काळात तरी, शिक्षण आणि नोकरीसाठी सुलभरित्या प्रवेश मिळवायला, फारच थोड्या देशांचे आणि तेही अगदी मोजकेच दरवाजे मोकळे किंवा सताड उघडे आहेत. (भविष्यकाळात कदाचित परिस्थिती खूप वेगळी पण बनू शकेल. अनेक भारतीयांचं भऱभरून स्वागतही होऊ शकेल. कोणी सांगावं? फक्त काळच त्याबद्दल सांगू शकेल!)

आता त्याबाबतीमधले माझे स्वतःचे काही स्वानुभवाचे बोलः

वर्षानुवर्ष परदेशात राहूनही आम्ही भारतीय (त्यात सर्व मराठीही आलेच) सर्वार्थानं सुखी, समाधानी असतो का? काय काय असतात तिथे स्थायिक होणाऱ्यांच्या व्यथा? दुःखे? समस्या? खूप काही असतात. आणि त्याही अगदी वेगळ्या स्वरुपाच्या. देशातल्या लोकांना, नातेवाईकांना, मित्रमंडळींना ज्याबद्दल इतक्या दूर कधीही आणि काहीही कल्पना येऊ शकणार नाही अशा व्यथा! त्यांचं स्वरुप थोडक्यात असं:

1. उच्च शिक्षण घेतानाच्या अडचणी म्हणजे भाषेची काहीशी अडचण, वेगळ्या वातावरणाशी जुळवून घेताना होणारे त्रास, आपल्या

शिक्षणाबद्दलची थोडीशी न्यूनगंडता आणि रंगभेदामुळे कधीतरी अप्रत्यक्षरित्या वाट्याला येणारी हेटाळणी.

2. नोकरी करणाऱ्या लोकांच्या समस्या थोड्या वेगळ्या असतः

आपल्यावर वेळोवेळी अन्याय होतो आहे की काय ही शंका, गोऱ्या सहाध्यायांची सर्वार्थानं बरोबरी करता यावी ही धडपड; गोऱ्या लोकांच्या वरचा हुद्दा मिळवण्यासाठी करावे लागणारे हरप्रयत्न. त्यामुळे भरपूर पगार मिळूनही कामाबद्दल नेहमीच समाधान वाटेच असं नाही.

3. शाळा आणि कॉलेजात शिकणाऱ्या मुलांनाही धर्म, भाषा, संस्कृती यांचा थोडाफार सामना करावा लागेच. शिवाय आईवडिलांचं शिक्षण, नोकरी या बाजू किती जमेच्या आहेत ते सुद्धा महत्त्वाचं ठरत असे. त्या काळात, रंग-वर्णभेदाचा फरकही बऱ्याच ठिकाणी-विशेषतः मुलांच्या पालकांकडून केला जाई. भारतीय मुलांच्या कोवळ्या मनावर ते देखील आघात होऊ शकत.

4. नोकरी न करता घरात रहाणाऱ्या स्त्रियांनाही बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागे. कधी अल्प शिक्षणामुळे योग्य ती नोकरी न मिळणं, भाषेची अडचण, मुलांना घरी ठेवण्याची गैरसोय. त्यामुळे अशा स्त्रियांना दिवसाचा बराच काळ (हवेची प्रतिकूलता आणि इतर अडचणींमुळे) घरातच काढावा लागे.

5. नोकरी करणाऱ्या कितीतरी स्त्रियांना सुद्धा, कधी मुलांमुळे, कधी शिक्षण अथवा अनुभव कमी असल्यामुळे, किंवा अन्य कारणांनी अर्धा

वेळच नोकरी पत्करावी लागे. बऱ्याच वेळा ती देखील त्यांच्या शिक्षणापेक्षा कमी दर्जाची. या सर्वातून घर-मुलं-नोकरी यांच्यामधली रस्सीखेच चाले ती वेगळीच.

या स्थानिक समस्यांव्यतिरिक्त, इतर असंख्य घरगुती प्रश्न प्रत्येकाला अस्वस्थ बनवीत असत ते वेगळेच. भारतातल्या नातेवाईकांबद्दलची ओढ, त्यांच्या तब्येतीची, आजारपणाची काळजी, सुट्टीवर येण्यासाठी सातत्यानं करावी लागणारी धडपड, आणि प्रत्येका ट्रिपसाठी कष्टानं जमा करावी लागणारी पुंजी. त्याशिवाय, सांस्कृतिक उपासमार, मातृभाषा, सण-संस्कार यांच्यापासून योजनं दूर. गोऱ्या समाजात वावरणाऱ्या आपल्या मुलामुलींची काळजी आणि प्रत्यक्ष मुलांची त्याबाबतीत कुचंबणा. अशा विविध व्यथा सगळयांची मनं अस्वस्थ करीत. त्यामुळे मायदेशी परतण्याची जबरदस्त ओढ वाटूनही, बहुसंख्य लोक, कायमचं भारतात परत येणं लांबणीवर टाकत. दरम्यानच्या काळात स्वतःबद्दलच्या अपेक्षा, कल्पना उंचावलेल्या असत, नातेवाईकांचे संबंध थोडेफार दुरावलेले, ना भारतीय ना परदेशी अशी मनाची नवी जडण-घडण झालेली, परदेशात जन्मलेली आणि वाढलेली मुलं तर पारच बदललेली. त्यामुळे प्रत्येकाला परतण्याची कितीही ओढ वाटत असली, तरी फारच कमी वेळा ते प्रत्यक्षात उतरे.

या सगळ्या समस्यांवर अंतिम उपाय किंवा तोडगा काय? परदेशातच कायम वास्तव्य करायचं असलं तर पुढे काय? पुढची पिढी हळूहळू भारतीय-परदेशी अशी मिश्र जमातच तयार होणार! त्यांना भारतीय

असल्याचा अभिमान कसा वाटणार? माझ्या मते, या सगळया प्रश्नांची उत्तरं कायमसाठी अनुत्तरीत ठेवणं हाच शहाणपणा!

****

- वरील सगळं विवेचन मी फार पूर्वीच्या भूतकाळात केलं होतं. परदेशामधला तो काळ अगदीच वेगळा होता. आज मोबाइल, इंटरनेट आणि इतर असंख्य सोयी-सुविधांच्या जमान्यात माझे त्याकाळचे विचार, वाचकांना काहीसे अविश्वसनीयच वाटतील. कारण सध्या परदेशात रहाणाऱ्या लोकांना, जरूर पडल्यास रोज चार वेळाही भारतात संपर्क साधता येतो. एकमेकांना प्रत्यक्ष व्हिडियोवर बघताही येतं (अगदी भाजी चिरत असताना सुद्धा मोबाइलवर आईला पुढची कृती विचारता येते). मायदेश-परदेश प्रवास तर मुंबई दिल्ली प्रवासाइतका सोपा आणि सुलभ झाला आहे. आपला देश आणि इतर पाश्चिमात्य देशांनी गमना-गमनाचे नियमही खूपच शिथिलं केल्यानं, नातेवाईकही बराच काळ आपल्या मुलांबरोबर परदेशात जाऊन राहू शकतात. त्यामुळे भारत आणि परदेश हे एकमेकांना हाकेच्या अंतरावरचे वाटायला लागले आहेत (एवढंच नव्हे तर, इंग्लंड सारख्या देशात, भारतीय वंशाचे पंतप्रधान

बनणंही अशक्यप्राय राहिलेलं नाही!). अशा स्थितीत माझा वरील लेख आणि त्यामधल्या विचारांची, सद्यकाळाशी तुलना करण्याचा प्रश्नच येत नाही. (परदेशात शिकायला गेलेली मुलं आता फारशी homesick देखील होत नसावीत असं वाटतं.) पूर्ण जमानाच बदलला आहे! आणि हे सगळे आधुनिक बदल अतिशय स्वागतार्हच आहेत. मात्र त्या दृष्टीमधून हा लेख वाचला जाऊ नये येवढीच विनंती.

●वर व्यक्त केलेली, १९८२ सालची माझी वैयक्तिक मतं आहेत. सर्व वाचक त्याबाबतीत, आज माझेशी सहमत होतीलच असं नाही. त्यातून, सध्याच्या तरुण पिढीला तर हे विचार काहीसे हास्यास्पदच वाटतील. पण त्यामुळे त्याकाळी होती ती सत्यपरिस्थिति बदलणार नाही हे निर्विवाद.

संतांचिये गावी प्रेमाचा सुकाळ

लहान मुलांसाठी लिहिलेली काही संतचरित्रं नुकतीच माझ्या वाचनात आली. आणि सहजच एक निराळं विचारचक्र मनामधे रुंजी घालायला लागलं. ते साधारण असं:

आपल्याला लागलं, कापलं किंवा जखम झाली आणि त्यावर फुंकर मारली की तात्काळ दिलासा मिळतो. तसंच आपलं मन उदास, बेचैन झालेलं असलं किंवा त्यावर एखादा आघात झालेला असला, तर दिलासा देणाऱ्या हळुवार शब्दांची फुंकरही त्याच प्रकारचं काम करू शकते.

संतांचे शब्द, त्यांची अमृतवाणीदेखील समाजाला अशीच उपयुक्त ठरत आलेली आहे. लोकांच्या मनावर संतांनी हळुवार, नाजुक फुंकर मारून संस्कार केले आहेत. दुःखी लोकांना दिलासा देणं, पीडितांना जवळ करणं, चुकलेल्यांना मार्गावर आणणं हे सर्वकाही साधूसंतांनी दीर्घकाळ केलेलं आहे आणि आधुनिक काळामधले सत्पुरुषही करीत आहेत.

लहान मुलाला थोडीशी समज आली की आपल्या बालबुद्धीनुसार आणि शक्तीनुसार खाणं, खेळ इत्यादी नित्याचे व्यवहार करायला मूल शिकत असतं. पण अशा गोष्टी करीत असतानाही त्याला सारखा आईचा

आधार हवा असतो. आपण पडलो तर धांवत येऊन आई आपल्याला उचलणार आहे, भूक लागली तर खायला देणार आहे, हा जो आईबद्दलचा विश्वास मुलांना वाटत असतो, तशाच प्रकारे- सामाजाचे आधारस्तंभ बनून, सारे संतमहंत, गरजवंतांच्या पाठीमागे सातत्यानं उभे असतात. मुलाला आपल्या आईबद्दल जे प्रेम, जो विश्वास आणि जी पराकोटीची श्रद्धा असते, तीच श्रद्धा आणि भक्तिभाव जर आपण संतांच्या प्रती ठेवू शकलो तर चुकत असणाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याचं, त्यांचं संरक्षण करण्याचं किंवा संकटकाळी संकटात सापडलेल्यांच्या मदतीला धावून जाण्याचं काम, संतमंडळी का करणार नाहीत? जरूर करतील.

आईनं मुलावर केलेलं प्रेम किंवा वात्सल्य, हे अगदी स्वाभाविक, नैसर्गिक, निरपेक्ष, उत्स्फूर्त आणि मनापासून असतं, तसंच संतजनांनी त्यांच्या चाहत्यांवर, भक्तजनांवर केलेलं प्रेम हे देखील शुद्ध आणि अपेक्षारहित असतं. त्यात वात्सल्य असतं, जिव्हाळा असतो आणि प्रेमाचा ओलावाही! आईला वास्तवात सगळीच मुलं सारखी.पण त्यातूनही तिच्याबद्दल आदर, भक्ती, प्रेम दाखवणारी मुलं असली, तर आईला तिच्या मातृत्वाचं सार्थक झाल्यासारखं धन्य वाटतं, तसंच संतांनाही, त्यांच्यावर श्रद्धा-भक्ती ठेवणारे सगळेच भक्त सारखेच प्रिय वाटतात.

निसर्गाचंच उदाहरण घ्यायचं तर ,निसर्गसान्निध्य आपल्याला नेहमीच प्रिय आणि हवंहवंसं वाटतं. हिरव्यागार वृक्षांची दाट सावली, फुलांच्या ताटव्यांनी मिळणारा निर्मळ आनंद, सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या नयनरम्य छटा, ढगांचे विविध रंग, झुळझुळणारं पाणी, उंच उंच पहाड, खळाळत वाहणारी नदी किंवा सागराच्या घनगंभीर लाटा या आणि अशा सृष्टीसौंदर्याची आपल्याला नेहमीच भुरळ पडते. त्यापासून सात्त्विक, सोज्वळ, सुंदर निखळ आनंद मिळतो. तसंच काहीसं संतांच्या सहवासाचं माहात्म्य असणार हे नक्की! संतांच्या दारात गारवा असतो, विसावा असतो, प्रेमाची दाट छाया असते. त्याचप्रमाणे, संतांच्या दृष्टीमधे स्निग्धता असते, त्यांच्या वाणीत निर्झरांची पवित्रता असते, धीरगंभीरता असते, दिलासा असतो आणि या सगळ्या शब्दांच्या पलीकडचंही खूप काही असतं.

मला खात्री वाटते की संत ज्ञानेश्वरांसारखे, तुकारामांसारखे संत महंत, ही मंडळी, निसर्गाची अनुभूती घडवणारी परमेश्वरस्वरूपेच आहेत. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून, हेव्यादाव्यंमधून जीवघेण्या स्पर्धांमधून बाहेर पडून आपल्याला निसर्गाच्या सान्निध्यात चार घटका घालवाव्याशा वाटतात, कुठेतरी शांतपणे विचार करीत बसावंसं वाटतं, ज्यामुळे आपल्या मनावरचे सारे ताणतणाव दूर होऊन एकप्रकारची मनःशांती लाभते. (त्यासाठीच तर आपण सहली-पर्यटनाला जातो.)

साधूसंतांचा सहवास- (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घडणारा)- हा असाच मनःशांती देणारा, दिलासा देणारा, मनावरची जाळीजळमटं- कोळीष्टकं झटकून टाकून, मन शुद्ध, स्वच्छ निर्मळ बनवणारा ठरू शकतो. संतचरित्रे, संतवाङ्मय आणि संतवाणी या विविध माध्यमांमधून त्यांचे विचार, सहजी आपल्या अंतःकरणापर्यंत पोहोचू शकतात. त्याव्यतिरिक्त, ज्या भक्तांना प्रत्यक्षात एखाद्या संताचा सहवास घडतो ते तर परम भाग्यवानच!

संतांच्या सहवासाची, त्यांच्या मार्गदर्शक शब्दांची, नव्हे त्यांच्या अस्तित्त्वाच्या नुसत्या जाणिवेची सुद्धा प्रत्येक नव्या पिढीला अत्यंत जरुरी

आहे. पाचशे-सहाशे वर्षांपूर्वीसुद्धा संतांच्या मुखातून जी अमृतवाणी पाझरली, ती आजच्या एकविसाव्या शतकामधल्या लोकांनाही मार्गदर्शक ठरते आहे, यावरूनच विविध संतांच्या वचनांचा महिमा स्पष्ट व्हावा.

आज आपलं जीवन अतिशय धकाधकीचं, गुंतागुंतीचं तर बनलं आहेच पण हेवेदावे, स्पर्धा आणि प्रवाहात टिकून रहाण्याची धडपड, फरफट सातत्यानं चालू आहे ती वेगळीच. त्यामुळे आयुष्याची शांतता कुठेतरी पार हरवते आहे.

मोठ्यांप्रमाणेच मुलंही आता जीवघेण्या स्पर्धांना अपवाद राहिलेली नाहीत. मुलांनाही आजकाल आयुष्याच्या शर्यतीत फार लवकर ओढलं जातं. त्यांना जर यशस्वी नागरिक बनायचं असेल, भरपूर शिक्षण आणि पैसा मिळवायचा असेल, तर वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षापासूनच मुलांना विविध स्पर्धांना सामोरं जायला आरंभ करावा लागतो. त्यात विकृत स्पर्धाही अनेक असतात. कित्येक वेळा पालकांच्या ध्येयाची पूर्ती करण्यासाठी देखील मुलांची बुद्धी आणि कर्तृत्व हे साधनांसारखं वापरलं जातं. ही सारी ओढाताण होत असताना, मुलांमधली नैसर्गिक हळुवार वृत्ती, खेळकरपणा आणि बालसुलभ निरागसताही कुठेतरी लोप पावताहेत की काय असं भय निर्माण व्हायला लागलं आहे.

अशा परिस्थितीत, चांगल्या संस्कारांचं अमृतसिंचन योग्य वयात मुलांवर झालं नाही, तर नवीन पिढ्या दिशाहीन किंवा बंड पुकारणाऱ्या, चुकीच्या मार्गानं चालणाऱ्या तर बनणार नाहीत ना याची खबरदारी घेणं देखील फार आवश्यक आहे. अशा कोवळया आणि संस्कारक्षम वयात, संतजनांचे विचार, संस्कार आणि शिकवण किंवा त्यांचे मुलांपुढे ठेवलेले आदर्श, अत्यंत मार्गदर्शक, लाभदायी आणि उपयुक्त ठरू शकतील, असं सहजच पण तीव्रतेनं मनात डोकावून गेलं. संतचरित्रं आणि त्यांची शिकवण अगदी लहानपणापासूनच जर गोष्टीरूपानं, चित्ररूपानं किंवा दृश्यरूपानं मुलांच्या मनावर ठसवली गेली, नव्हे संतांच्या संस्कारांचं आणि उच्च विचारांचं बाळकडू मुलांना पाजून त्यावर त्यांच्या शक्ती, बुद्धी सामर्थ्याचं पोषण झालं, तर नव्या पिढ्या अधिक सच्छील, सशक्त आणि सद्वर्तनी निपजायला मदत होऊ शकेल याबद्दल जराही संदेह वाटत नाही.

मोठ्या माणसांच्या मनात जर या प्रकारचा दृढभाव आणि भक्ती आधीपासूनच रुजलेली असेल, तर अशा घरांमधून आपोआपच मुलांवर ते संस्कार घडतात. प्रत्यक्ष संतवाणी आणि त्या वाणीद्वारे अप्रत्यक्षरित्या घडणारा संतांचा सहवास हा मला वाटतं एखाद्या चुंबकासारखा आहे. आपण साऱ्या 'जड' व्यक्ती म्हणजे जणू लोहाचे तुकडे आहोत. एखाद्या शक्तिशाली चुंबकाच्या नुसत्या सान्निध्यात सुद्धा जशी लोखंडाला आकर्षून घेण्याची किमया असते, तसंच काहीसं आकर्षण-मोहिनी, त्रिकालाबाधित

अशा संतवचनांमधे सामावलेलं आढळतं. ज्यामुळे त्यांचे सगळे भक्त आपोआपच त्यात ओढले जातात.

आज एकविसाव्या शतकात आपली मार्गक्रमणा चालू असताना सुद्धा, कितीतरी साधूसंत समाजात आपल्या अवती-भवती वावरत असतील आणि लोककल्याणासाठी झटत असतील. फक्त आपणच जाणून बुजून अशा "**संतांच्या गावाचा" मागोवा घ्यायला हवा!**

विभाग ३

व्यक्तिगत- शब्द शब्द जपुन ठेव.

- आम्ही पुणेकर झालो
- माझी शाळा, माझं गाव
- आमचे परमस्नेही अंबादास वाघ आणि त्यांची “फुलराणी”

आम्ही पुणेकर झालो

मॅंचेस्टर विमानतळावरून निघतांना (१९८०)

दिनांक १ मार्चच्या सकाळी तुम्हा सर्व मँचेस्टरवासी प्रियजनांचा निरोप घेऊन आम्ही मँचेस्टर-म्हणजे पर्यायानं इंग्लंडचा किनारा सोडला. विमानाच्या खिडकीतून दिसणारे तुम्हा सर्वांचे चेहरे आणि हलणारे हात बघून मन अनेक संमिश्र भावनांनी भरून आलं. इतक्या वर्षांचे जोडलेले स्नेहबंध क्षणात दूर करताना, मनात ज्या भावनांची दाटी झाली होती, ती

कागदावर मांडणं सोपं नाही. आम्ही मायदेशाकडे परतत होतो पण कर्मभूमीशी जोडलेले मायापाश आणि त्यांची ओढ आम्हाला जणू मागे खेचत होती. क्षणभर वाटलं...असंच मागे फिरावं. पण.....

पॅरिसला रेंगाळलेलं आमचं विमान फक्त सहा तास उशीरा मुंबई विमानतळावर पोहोचलं. रविवार सकाळ असल्यानं आमचं तिथे जोरदार स्वागत झालं. (पहिला सुखद धक्का म्हणजे स्वत: अरुण दाते, त्यांची गाडी घेऊन विमानतळावर पुष्पगुच्छासह समोर उभे होते). पाडव्याच्या मुहूर्तावर आम्ही पुण्याच्या ब्लॉकमध्ये प्रवेश केला.

ब्लॉक प्रशस्त आहे एवढी जमेची बाजू वगळली, तर बाकी अनेक गैरसोयी आत्ता तरी तापदायक वाटताहेत. गॅस नाही, फोन नाही, पुरेसं पाणी नाही, या तर अगदीच किरकोळ बाबी झाल्या. पण आमचा हा ब्लॉक- दोन हमरस्त्यांच्या कोपऱ्यावर असल्यामुळे, रस्त्यावरून जाणारं एकही वाहन, जोरानं हॉर्न वाजवून आम्हाला 'हॅलो' म्हटल्याशिवाय पुढे सरकतच नाही.

इंग्लंडमधे राहून, एवढं 'महत्त्वाचं' स्थान प्राप्त होण्याची संवय नसल्यानं, कान बधीर होतात आणि जीव गुदमरून जातो. थोडक्यात असं की भर रस्त्यावरचा दुसऱ्या मजल्यावरचा ब्लॉक, भरपूर गर्दीचा वाहता रस्ता,वाहनांचे कर्कश आवाज आणि खाली अमृततुल्यचे दुकान! पहाटे चारलाच बटाटेवडे तळायला आरंभ होतो. त्यामुळे पहाटे पहाटे दरवळणारा कांदा-लसुणाचा 'सुगंध' झोपेतून जागं करतो. विक्रेत्यांची दाराशी सारखी वर्दळ चालू आणि त्यात इतर लोकांची दारं नेहमीच सताड उघडी. त्यामुळे

सगळेच व्यवहार शेजाऱ्यांच्या सल्ल्यानं करावे लागतात. समोरच उसाचं गुऱ्हाळ आहे. बाल्कनीत उभं राहून नुसता हातानं इशारा करून, बोटांनी संख्या दर्शवली, की हवे तेवढे ग्लास घरपोच येणार. (किती छान सोय आहे ना? इंग्लंडमधे स्वप्नात सुद्धा ही कल्पना सुचणार नाही)

अनेक वर्षांच्या परदेशातल्या वास्तव्यानंतर, आणि प्रथमच भारतात बिऱ्हाड थाटत असल्यानं, पाहुणे आणि आम्ही बरोबरच गृहप्रवेश केला. (गेल्या तीन महिन्यांमधे, नातेवाईक आणि जुन्या-नव्या ओळखीचे लोक मिळून, जवळपास दीडशे लोकांनी आमचा ब्लॉक पाचारण केला.) इंग्लंडमधे तीन वर्षात केलं नसेल इतकं चहापाणी, खायला आणि स्वयंपाक मी गेल्या तीन महिन्यात बनवलं. वर्षभरात माझ्या सगळ्या पाककृतींना चांगलाच उजळा मिळणार आहे, यात मला आता जराही संदेह वाटत नाही.

प्रत्यक्ष नील मात्र भारतात खूपच आनंदात आणि खुष आहे. इथल्या जीवनक्रमाशी समरस होण्याची धडपड तो मन लावून करतो आहे. इंग्रजी भाषा आता त्याला बरीच परकी आणि अवघड वाटायला लागली आहे. देणगी देऊन शाळेत प्रवेशही झाला आहे. इथली लहान लहान शाळकरी मुलंसुद्धा अभ्यास, होमवर्क, वह्या-पुस्तकं यांच्या भाराखाली किती दबून जातात हे आता मी जवळून बघते आहे. बिचारी भारतीय मुलं!

तिकडून आणलेला आमचा टेलिव्हिजन अगदी व्यवस्थित चालतो आहे. पण भल्यामोठ्या टी.व्ही. ला अगदी अल्पशा कार्यक्रमांवर आणि तेही श्वेतधवल रंगावरच संतुष्ट राहावं लागतं. संगीताच्या क्षेत्रात मात्र महाराष्ट्रात

खूपच प्रगती आढळली. मुलामुलींमधे गाणं शिकण्याचं प्रमाणही प्रचंड वाढलं आहे. त्यात टी.व्ही च्या वाढत्या लोकप्रियतेमुळे, पण तुटपुंज्या कार्यक्रमांमुळे, काही वेळा अगदी सामान्य गायकांची छबी सुद्धा वारंवार प्रेक्षकांच्या नजरेसमोर येत रहाते.(पण तो भाग अलाहिदा!)

बस्तान बसवण्याच्या दृष्टीनं मात्र, आमची प्रगती अगदी कासवाच्या गतीनं चालू आहे. बारा महिन्यांच्या ठरवलेल्या वास्तव्यापैकी चार महिने मागे पडले. पुढच्या आठ महिन्यांमधे आम्हाला भविष्यकाळाचा काय तो निर्णय घ्यायचा आहे. अजूनही अनुकूल किंवा प्रतिकूल विचारांकडे पारडं पूर्णपणे झुकलेलं नाही. तरीही आपली माणसं, आपला देश, जवळचे नातेवाईक,हितचिंतक मित्रमंडळी आणि आपली उच्च दर्जाची मराठी संस्कृती या सगळया जमेच्या बाजू सोडून, पुन्हा तिकडे कायमचं परत यावं असं सध्यातरी वाटत नाही. प्रश्न फक्त पैसे मिळवण्याचाच आहे.

आरंभी मी गैरसोयींचा इतका मोठा पाढा वाचला की, त्यामुळे आम्ही नक्कीच माघार घेऊन लगेच काही काळात तिकडे परतणार असं तुम्हा सर्वांना मनोमन वाटलं असेल. पण.. थांबा! दुसऱ्या टोकाला जाऊन बोलायचं तर इथल्या वास्तव्यात पहिल्या दिवसापासूनच असे काही सुखद अनुभव यायला सुरवात झाली आहे की, किरकोळ त्रासांचं त्यापुढे काहीच वाटेनासं झालं आहे. इथे आमच्या रहाण्याच्या नीट सोयी लागव्यात या-दृष्टीनं सर्व नातेवाईकांनी तर भरभरून मदत केलीच, पण ओळखीच्या आणि

अगदी नवीन ओळखी झालेल्या लोकांनी सुद्धा, सर्व प्रकारच्या मदतीसाठी मनापासून हात पुढे केला.

पाहिल्याच महिन्यात एकेदिवशी अचानक अरुण दाते दोन अतिशय आवडत्या आणि लोकप्रिय कलाकारांना आमच्या घरी घेऊन आले. (अचानकच म्हणायचं! कारण फोन करायला फोन होताच कुठे?) सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्रीनिवासजी खळे आणि सर्वांचे लाडके कवि मंगेश पाडगावकरजी. आमचा तर अक्षरश: आमच्या डोळयांवर विश्वासच बसेना. नुसते भेटायला नव्हे, तर त्या दुपारी आणि सायंकाळी, तिघांनी मिळून चक्क दोन घरगुती मैफिली घडवून आणल्या. एक काव्य-वाचनाची आणि दुसरी गाण्यांची. बोटीनं येणारं आमचं सामानही अजून पोहोचलेलं नव्हतं. बैठकीसाठी जेमतेम दोन सतरंज्या आणि दोन गाद्या होत्या आणि जेवणासाठी अत्यंत साधा बेत. पण कोण विसरू शकेल ती अत्यंत सुरमयी, सुखदायी आणि अविस्मरणीय अशी दुपार आणि संध्याकाळ?

असे अनेक सुखद प्रसंग घडत राहिल्यानं, प्रतिकूलतेमधूनही आमचं पुण्यामधलं वास्तव्य तर स्थिर व्हायला लागलंच, पण खऱ्या अर्थी इथल्या जीवनाशी आम्ही समरसही होत गेलो.

आणखी एक मजेशीर किस्सा म्हणजे आमच्या समोरच्या बिल्डिंगमधेच प्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक भास्कर चंदावरकर रहातात.

अरुण मुजूमदार, सरोज सहस्रबुद्धे, मंगेश पाडगांवकर, अरुण दाते व श्रीनिवास खळे

शेजारच्या बंगल्यात विनोदी नट मधु आपटे आणि त्यांचे पलीकडल्या बंगल्यात, एकेकाळच्या लोकप्रिय मराठी अभिनेत्री बेबी शकुंतला. प्रसिद्ध गायिका श्रीमती कुसुम शेंडेंचे चिरंजीव - गायक डॉक्टर संजीव शेंडे यांचा, शेजारच्याच बिल्डिंगमधे दवाखाना आहे. (योगायोगाची गोष्ट अशी की, डॉक्टर शेंडेंच्या दोन्ही मुली - बेला आणि सावनी पुढे इतक्या मोठ्या नावाजलेल्या गायिका होतील याची त्या वेळी आम्हाला कल्पनाही नव्हती).

दरम्यानच्या काळात, वसंत पोतदार एकदा मुक्कामाला आलेले असताना, त्यांना आमचा आर्थिक जम बसत नसल्याचं जाणवलं आणि

त्यांनी त्यांच्या नेहमीच्या अधिकारवाणीनं ठणकावून सांगितलं की, काहीही झालं तरी मी आता तुम्हाला परत जाऊ देणार नाही. मी स्वतः श्रीमंत नाही पण तुम्ही इथे रहावं म्हणून मी बँकेवर दरोडा घालून सुद्धा तुमची पैशांची सोय करून देईन. त्यांच्या या अनपेक्षित आपुलकी आणि प्रेमानं आम्ही तिघांनीही ताबडतोब निर्णय घेऊन टाकला की, कितीही अडचणी आल्या, तरी पुनश्च इंग्लंडला परत जायचं नाही. नीलला "भारतीय" बनवण्याचा जो मूळ उद्देश आहे, तो काहीही झालं तरी सफल व्हायलाच हवा. त्या दिवसापासून खऱ्या अर्थानं आम्ही पुण्याच्या आमच्या जीवनाशी समरस झालो. आणि पुढे एकही दिवस त्याबद्दल खंत वाटली नाही.

लिहिता लिहिता माझं पत्र खूपच लांबलं आहे. त्यामुळे उरलेला मजकूर आता पुढच्या पत्रासाठी बाकी ठेवायला हवा!

तुमची,
सरोज

****

●कविवर्य मंगेश पाडगावकरजी आणि संगीतकार श्रीनिवास खळेजींच्या भेटीनंतर, त्या दोघांबरोबर चालू झालेल्या पत्रव्यवहारापैकी, नमुन्यादाखलचे मंगेश पाडगांवकरांचे एक पत्र खाली देत आहे.




ગઝલ

अन्तर्देशीय पत्र कार्ड
INLAND LETTER CARD

Dr. Mrs. Saroj Sahasrabuddhe
Block-2/Sushila Apartments (A)
Plot No. 4/68
Karve Road
PUNE 411004
पिन PIN 411004

इस पत्र के भीतर कुछ न रखिए NO ENCLOSURES ALLOWED
प्रेषक का नाम और पता :— SENDER'S NAME AND ADDRESS :—

१९/६/८०

डॉ.सौ. सरोज सहस्रबुद्धे

यांस सप्रेम नमस्कार

तुमच्या सुंदर अक्षरातले सुंदर पत्र मिळून बरेच दिवस झाले. तुमचे पत्र १२ एप्रिलचे आहे आणि आज १९ जून. तुमचे पत्र मिळाल्यापसून उत्तर लिहिण्याचा संकल्प सारखा करतोच आहे. तुमच्या सुंदर अक्षरामुळेच मी बिचकून पत्र लिहिणे लांबणीवर टाकले असावे असा मला संशय येतो आहे: आपले स्वत:चे अक्षर वळणदार नाही हे इतक्या उघडपणे सिद्ध करण्याचा प्रसंग सहजासहजी कोण ओढवून घेईल? तरीही आज संकल्प तडीस नेण्याचा निर्धार करून पत्र लिहायला बसलो आहे.

तुमचे पत्र म्हणजे एक भावपूर्ण कविताच आहे. हे कविता-पत्र वाचताना पुण्यातल्या दोन्ही मैफिली- दुपारची आणि रात्रीची- मनात उभ्या राहिल्या. असे क्षण- तुमच्या शब्दात सांगायचे म्हणजे मखमली सुरांचं चांदणं उधळणारे क्षण- अट्टाहासाने जमवता येत नाहीत. खरोखरीच तो एक योगायोग असतो. पुण्याला आलो असताना हा योग अकल्पितपणे जमून आला. तसा योग पुन्हा जमून येईल अशी आशा बाळगून आहे.

मध्यंतरी एक-दोनदा मी पुण्याला येऊन गेलो. तुमच्याकडे स्वतंत्रपणे येण्याइतके माझ्या स्मरणात रस्ते रहात नाहीत. तुमच्या पत्रावर फोन नंबर नाही. मी तुमच्या घरी आलो होतो तेव्हा तुमच्याकडे फोन होता असे अंधुक आठवते. तात्पर्य, येऊ शकलो नाही– पण आठवण मात्र केली.

तुमचे सामान येऊन घर नीट लागले का? श्री सहस्रबुद्धे यांचे काम कसे चालले आहे? पुण्याला तुम्ही एव्हाना रुळला असाल. नील काय म्हणतो? त्याची शाळा आता सुरू झाली असेल. पुणेकरांनी त्याचे इंग्रजी नीटसे बिघड्वले की नाही? त्याला मराठी मात्र आता चांगलेच बोलता येत असेल.

तुम्ही आता काय करायचे ठरवले आहे? तुमच्या अभ्यासविषयाला तिथे काही वाव मिळण्याची शक्यता आहे काय? कोणत्या योजना आखता आहात ते जरूर कळवा.

पुण्याला सध्या हवा सुंदर असेल. भोवती हिरवेगार आणि त्यात पावसाची गोड कोवळी उदासी मला फार आवडते. सध्या मुंबईला जोरात पाऊस सुरू झाला आहे. निष्कारण झोडपणाऱ्या रागीट मास्तरासारखा तो पुष्कळदा वागतो. त्याचा मार खात ऑफीसात बस पकडून जाणे आणि परत तसेच संध्याकाळी घरी येणे हे एक श्रेष्ठ कौशल्य आहे असे मला वाटते. कपडे आवरीत सावरीत कामावर जायचे म्हणजे पावसाची सगळी गम्मत निघून जाते.

पत्र बरेच लांबले. श्री सहस्रबुद्धे यांना नमस्कार. चि. नील याला आशीर्वाद. पुण्यातल्या मैफिलीची आठवण म्हणून एक नवा गझल तुम्हाला वाचण्यासाठी सोबत पाठवीत आहे. पत्र मिळाल्याचे अवश्य कळवा.

आपला

मंगेश पाडगांवकर

गझल

रंगास या स्वरांनी मी गुणत राहिलो
गाणे कळयाफुलांचे गुणगुणत राहिलो.

चोरून घेतलेली पहिलीच भेट ती
मी मुग्ध काकणांनी किणकिणत राहिलो.

झंकार पालवीचा फांदीतुनी फुटे
मी तार त्या स्वरांनी झिणझिणत राहिलो.

लडिवाळ वाहताना खडकातुनी झरे
मी छंद भारलेला रुणझुणत राहिलो.

ध्यानस्थ मध्यरात्री नि:शब्द शांतता
मी आतल्या दिव्याने मिणमिणत राहिलो.

झाली पहाट जेंव्हा ही शुभ्र प्रार्थना
हे सूक्त पाखरांचे मी म्हणत राहिलो.

मंगेश पाडगांवकर

माझी शाळा, माझं गाव

ज्या शाळेत माझं ११वी पर्यंतचं शिक्षण झालं, त्या शाळेला ६० वर्षे पूर्ण झाली, त्या निमित्तानं तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम होणार होता. सर्व कार्यक्रमांची ‘प्रमुख पाहुणी’ म्हणून मला निमंत्रण आलं आणि शाळेबद्दलच्या सगळया जुन्या आठवणी नव्यानं जागृत झाल्या. निमंत्रणाला होकार तर कळवला. कारण जवळपास पंचवीस वर्षांनी ‘माझ्या’ शाळेला भेट देण्याचा सुवर्णयोग चालून आला होता.

कमलाबाई कन्या शाळा- धुळे. तशी शाळा मला अजिबात परकी नाही. शालेय शिक्षण तिथेच पार पडलेलं. त्यानंतर, बी.एस्सी झाल्यावर तीन वर्ष शिक्षिका म्हणून, गणित, सायन्स आणि भूगोल हे विषय दहावी-अकरावीच्या मुलींना शिकवण्याचं कामही केलेलं. त्यामुळे शाळेत मी एकूण दहा वर्षं घालवली होती. मनात असंख्य आठवणी साठलेल्या आणि साठवलेल्या होत्या. धुळे हे माझं जन्मगाव आणि माहेरगावही. त्यामुळे “कमलाबाई कन्या शाळा” हे एका अर्थी माहेरघरच. माहेरी जायला कुठल्या स्त्रीला आवडणार नाही? मात्र ‘प्रमुख पाहुणी’ ही फारच मोठी उपाधी लावल्यासारखं वाटायला लागलं. मी तर साधी माजी विद्यार्थीनी आणि

माजी शिक्षिका. त्यामुळे शाळेची निकटवर्ती आणि हितचिंतक. एका अर्थी माझा शाळेवर आणि शाळेचा माझ्यावर हक्कच होता.

माझ्या विद्यार्थीदशेमधली शाळा नजरेसमोर तरळली. मुलींची संख्या पाचसहाशेच्या आसपास होती. आणि एकच मोठी इमारत. त्यामुळे वर्ग आणि शिक्षकांची संख्याही मर्यादितच होती. सगळयाच शिक्षकांशी वैयक्तिक ओळखी आणि जिव्हाळयाचे संबंध असत. अभ्यासाव्यतिरिक्त इतर असंख्य कार्यक्रम व्हायचे. संक्रांतीला तिळगूळ घेण्याचा कार्यक्रम ही मोठी पर्वणीच असायची. सगळया शिक्षकांच्या घरी गटागटानं जाऊन तिळगुळाची भरपूर कमाई व्हायची. (एकेक लाडू पिंगपाँगच्या चेंडूएवढा असायचा.) त्याशिवाय शाळेत आम्ही गणेशोत्सवात मोठी आरास करायचो. शारदोत्सव, वसंतोत्सव, टिळक जयंती, शिवजयंती, गांधी जयंती, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन असे कितीतरी उत्सव आणि समारंभ- धार्मिक, सामाजिक राजकीय- अतिउत्साहाने आम्ही साजरे करीत असू.

आपण भारतीय लोक मुळातच उत्सवप्रिय. उत्सवांच्याद्वारा चांगले संस्कार घडतात, माहिती मिळते, नव्या गोष्टी शिकायला मिळतात आणि विचारांची, कल्पनांची देवाण-घेवाण होते.

परदेशच्या दीर्घ वास्तव्यातही सणांची आणि उत्सवांची परंपरा आम्ही थोडीफार चालू ठेवली होती. दिवाळी, दसरा, होळी, संक्रांत, गणेशोत्सव वगैरे सण आणि त्याबरोबरच इतर मराठी सांस्कृतिक उत्सवही आम्ही साजरे करायचो ते वेगळेच. अशा काही कार्यक्रमांना, इंग्रज मित्रमंडळींनाही निमंत्रण

देऊन त्यात सामील करून घ्यायचो. इंग्रजी लोक मुळातच चौकस आणि जिज्ञासू वृत्तीचे. त्यामुळे असंख्य प्रश्न विचारायचे. त्यांचं शंकासमाधान करण्यासाठी मग जास्तच माहिती गोळा करावी लागे. ज्या देशात रहायचं त्यांच्याही उत्सवांमधे सामील व्हावं लागे. नाताळ हा दिवाळीसारखा, गायफॉक्स-होळी शिमग्यासमान तर ईस्टर म्हणजे नव्या युगाचा आरंभ.

इंग्लंडमधे असताना मॅंचेस्टर विद्यापीठात पाच वर्षं उच्च शिक्षणात घालवली. पदव्या संपादन केल्या. थोडंफार अध्यापनही केलं आणि कॅन्सर-संशोधनाच्या क्षेत्रातही अनुभव मिळवले. पण हे सारं करीत असताना, शालेय जीवनात जे संस्कार, सगळ्या शिक्षकांनी केले होते, ते मला फारच उपयुक्त ठरले. विद्यार्थीदशेमधे झालेले सुसंस्कार खोलवर जातात. त्याच वयात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होत असतो. स्वभाव, गुणदोष, प्रभावी व्यक्तिमत्त्व यांचे संस्कार, भावी आयुष्यात सुद्धा अतिशय कामी येतात. आपल्या आई-वडिलांप्रमाणेच शिक्षकांचाही त्यात सिंहाचा वाटा असतो. त्यामुळे आपण सगळ्यांनीच, त्याबद्दल पालक आणि शिक्षकांचं ऋणी रहायला हवं!

वास्तवात आपल्यापेक्षा वयानं, ज्ञानानं किंवा अनुभवानं महान असणाऱ्या सगळ्याच व्यक्तींचा प्रत्येकानं आदर करायला हवा. दरेक मोठ्या व्यक्तीजवळ किमानपक्षी एक घेण्यासारखा गुण आहे असं मानलं तरी गुणग्राहकतेची संख्या किती मोठी होऊ शकेल! आपल्या हिंदू धर्मात आपण तेहतीस कोटी देव आहेत असं मानतो. प्रत्येका देवाचा एक गुण उचलायचा

म्हटला तरी आयुष्यभर पुरतील इतके गुण अंगी येतील. (प्रयोगादाखल, एक आठवडा आपण फक्त सर्वांप्रती आदरभावना जरी जोपासून बघायची ठरवली, तरी आठवडाभरात असंख्य नव्या गोष्टी शिकता आणि अनुभवता येतील.)

मनात आलं की भाषण करताना मी विद्यार्थीनींना कोणत्या गोष्टी आवर्जून सांगू शकेन.

- चांगल्या संस्कारांचा योग्य तो विनियोग करायला शिका, घरी-शाळेत आणि समाजात वावरताना ज्ञानलालसा आणि अभ्यासू वृत्ती बाळगा. तुमची निरीक्षणक्षमता वाढवा. दहावी झाली म्हणजे शिक्षणाचा उच्चांक गाठला असं समजू नका.
- मिळवलेल्या ज्ञानावर चिंतन आणि मनन करायला शिका. शालेय-शिक्षण तर अत्यावश्यक आहेच, पण आयुष्यभरच विद्यार्थी बनून रहाण्याची मनाला आणि शरीराला संवय लावून घ्या.
- तास अर्धा तरी रोजचं वर्तमानपत्र नियमानं वाचा. आपल्या सभोवती काय घडतं आहे ते डोळसपणे अवलोकन करण्याची आणि समजावून घेण्याची मनाला संवय लावून घ्या.

●आकाशवाणीवरचे चांगले-चांगले कार्यक्रम ऐकणं आणि दूरदर्शनवरचे बातम्या-माहितीपटांसारखे कार्यक्रमही बघायला मुळीच हरकत नाही. त्यामुळे चौफेर ज्ञान वाढायला मदत होईल.

●गावामधे होणाऱ्या महत्त्वाच्या भाषणांना, व्याख्यानमालांना आवर्जून जायला हवं. मोठमोठ्या लोकांचे प्रगल्भ विचार कानावर पडले की आपल्या ज्ञानात तर भर पडतेच, पण त्यामधून नवेनवे दृष्टीकोन निर्माण होऊन, विचारांना अधिक चालना मिळते.

कमलाबाई कन्या शाळा (धुळे) बक्षीस समारंभ

कमलाबाई कन्या शाळा हे तर धुळ्याचं मानचिन्ह! गेल्या साठ वर्षांच्या दीर्घकाळात या संस्थेनं, धुळ्यामधल्या शेकडो भावी महिला घडवल्या आहेत. त्यादेखील अत्यंत यशस्वीरित्या. शाळेच्या कितीतरी माजी विद्यार्थिनी आणि माजी शिक्षिका आज मोठमोठ्या पदांवर आहेत. शिक्षिका, संगीत-शिक्षिका, गायिका, प्राध्यापिका, चित्रकार, कवयत्री, परिचारिका, डॉक्टर, वैज्ञानिक, विभागप्रमुख आणि इतर असंख्य. ज्या काळात स्त्री-शिक्षण हे फारसं महत्त्वाचं मानलं जात नव्हतं त्या काळापासून तो थेट स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीपर्यंत, निरनिराळी स्थित्यंतरं शाळेनं पाहिली आहेत.

चित्रकला, हस्तकला, संगीत, शिवणकला आणि पाकशास्त्रापासून तो शरीरविज्ञानापर्यंत, विविध प्रकारचे अभ्यासक्रम शाळेनं राबवले आहेत. सांघिक कवायती, विविध खेळ, शाळेचा मुलींचा मोठा बँड, अशा प्रकारचेही कित्येक उपक्रम! शेवटी कुठलीही उत्तम शिक्षणसंस्था ही अखेर फक्त दगडामातीची किंवा उंच इमारतींची नसते. त्यामधलं सगळं चैतन्य हे तिथलं प्रसन्न वातावरण, विद्यार्थीवर्ग, शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्यावर अवलंबून असतं.

शाळेची एकूण प्रगती, उन्नती आणि भरभराट अत्यंत वाखाणण्याजोगीच आहे. विद्यार्थिनींची संख्या तीन हजारांच्यावर आणि शिक्षकवर्ग शंभरच्या आसपास आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जिथं शिक्षणकार्य चालू आहे त्यावरून, माझ्या आठवणीमधल्या लहानशा शाळेचा आता प्रचंड मोठा वटवृक्ष झाला आहे, या विचरानं मन भरून आलं.

धुळे शहराबद्दलच बोलायचं तर धुळ्याच्या लोकांमधली आस्था, आतिथ्यशीलता, सौजन्य आणि सहिष्णुता अजूनही तितकीच कायम आहे, ही गोष्ट आभिमानानं सांगावीशी वाटते. धुळ्याचं भूषण ठरावं अशा कितीतरी सार्वजनिक आणि लोकोपयोगी कार्य करणाऱ्या संस्था या गावात आहेत!

समर्थ वाग्देवता मंदिर आणि **सत्कार्योत्तेजक सभा!** (या संस्थांमधे असणारा समर्थ-वाङ्मयाचा अमुल्य ठेवा, महाराष्ट्रात दुसरीकडे कुठेच आढळणार नाही.) त्यामुळे श्री.समर्थ रामदासस्वामींच्या शिकवणींचे संस्कार, धुळेकरांवर झालेले आहेत.

राजवाडे संशोधन मंडळात- इतिहासकालीन ग्रंथ, पोथ्या आणि ऐतिहासिक वस्तूंचं प्रचंड मोठं संग्रहालय आहे.

पुज्य विनोबाजी भावे यांनीही काही वर्षे धुळयामधे राहून, स्वतःची अभ्यासिका स्थापन केली होती. त्यांची अनेक प्रवचने आम्ही लहानपणी धुळयात ऐकली. (विद्यार्थिनी असताना, मी शाळेच्या मासिकासाठी घेतलेली त्यांची एक मुलाखतही मला अजून आठवते.)

शाळेसोबतच, माझ्यावर संस्कार करणाऱ्या या संस्थाही, तीव्रतेनं आज माझ्या नजरेसमोर उभ्या राहिल्या. शालेय जीवनाच्या काळात, असंख्य वेळा या संस्थांना मी भेटी दिलेल्या आहेत आणि सगळयाच भेटी संस्मरणीय ठरल्या आहेत.

वास्तवात प्रत्येकालाच आपल्या शाळेचा, घराचा, गावाचा अभिमान वाटत असतो. आणि कां वाटू नये? अगदी स्वाभाविक मनोधारणाच आहे ती! देशामधल्या प्रत्येक नागरिकानंच आपलं घर, शाळा, गाव यांच्याबद्दल आदर, कृतज्ञता आणि अभिमान बाळगला, तर त्यातूनच खराखुरा देशाभिमान जागृत होऊ शकेल.

“Charity begins at home-”plus school & your own town!

●शाळेबद्दलचा हा लेख मी फेब्रुवारी १९८९ मध्ये, शाळेच्या एकसष्टाव्या वर्धापनानिमित्त लिहिला. त्यानंतर डिसेंबर १९९४ मधे धुळयाला अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचं संमेलन झालं. त्या संमेलनात **‘सन्मानकरी’** म्हणून मला बोलावण्यात आलं होतं.

त्या मुक्कामात पुनश्च भाषण देण्यासाठी शाळेचं निमंत्रण आलं. धुळ्याची आणि शाळेची माजी विद्यार्थिनी व माजी शिक्षिका म्हणून मला मिळालेल्या सन्मानाबद्दल शाळेनं पुन्हा एकदा सत्कारही केला.

● त्या आदरातिथ्याबद्दल एवढंच म्हणावंसं वाटतं- **मम शाळेची 'कन्या' म्हणुनी वाटतसे अभिमान!**

डॉ. भवाळकर यांचेकडून सन्मानपत्र स्वीकारताना

आमचे परमस्नेही अंबादास वाघ आणि त्यांची “फुलराणी”

अंबादास वाघांचा आणि माझा परिचय फार जुना. आम्ही दोघेही धुळ्याचे (खानदेश) रहिवासी. त्यामुळे शालेय जीवनापासूनच मी त्यांना ओळखत होते.वाचन हा त्यांचा अत्यंत आवडता छंद. आमच्या घरीही सर्वांना वाचनाची आवड असल्यामुळे, ते अनेकदा घरी येत असत. त्या काळापासूनच अंबादासना साहित्यिक गप्पा, मनापासून आवडत असत. धुळ्याचं ‘‘गरुड वाचनालय ‘‘हे आम्हा सर्वांचं साहित्यिक केंद्र होतं.

अंबादासचे वडील माजी स्वातंत्रसैनिक तर होतेच, पण सानेगुरुजींचे ते फार मोठे भक्त होते. आणि दरवर्षी पंढरपूरच्या वारीला जाण्याचा नियमही त्यांनी अखेरपर्यंत जपला. अशा आदर्श पित्याकडून अंबादास यांनी खूप गुण उचलले होते. वाचनाची आणि चांगल्या साहित्याची आवड, वक्तशीरपणा, शिस्त, टापटीप आणि परोपकारी वृत्ती, त्यांच्यात बालपणापासूनच आलेली होती.

आम्ही भारतात परत आल्यानंतर पुण्याला स्थायिक झालो. अंबादास त्यांच्या कुटुंबासह शहाद्याला रहातात असं कळलं आणि इतक्या वर्षांचा तुटलेला संपर्क योगायोगानंच पुन्हा जुळून आला. तोही केवळ त्यांच्या एकट्याशी नव्हे, तर वाघ परिवार आणि सहस्रबुद्धे परिवार हे निकटवर्ती बनून, एकमेकांशी मैत्रीच्या धाग्यानं बांधले गेले. दोन्ही कुटुंबे एकमेकांचा पाहुणचार घ्यायला लागली आणि मैत्रीचे संबंध अधीकच दृढ होत गेले.

अंबादास आणि त्यांची सहधर्मचारिणी (आणि आत्ताची माझी जिवलग मैत्रीण) विभावरी हे दोघे मिळून आदिवासी भागातील वाचकांसाठी शाहाद्याहून **"फुलराणी"** हा दिवाळीअंक, दर दिवाळीला प्रकाशित करीत असत. त्या अंकासाठी वाघ दाम्पत्य आणि त्यांची दोन मुलं अतिशय परिश्रम घेऊन एक अत्यंत दर्जेदार दिवाळी अंक दरवर्षी वाचकांना सादर करीत. फुलराणीच्या निमित्तानं आमची पुनर्भेट झाली. पुणे-शहादा अंतर बरंच होतं, तरीही फुलराणीचं सहसंपादन मी करावं अशी दोघांनीही मला गळ घालून नकाराला जागाच ठेवली नाही. वाटलं, तेवढीच मराठी साहित्याशी जवळीक करता येईल आणि तुटलेली नाळ पुनश्च जोडता येईल.

फुलराणीच्या अंकांसाठी पुढे मी विविध विषयांवर अनेक लेख लिहिले आणि वाघ दाम्पत्याच्या आग्रहाखातर त्या वार्षिकाचे सहसंपादनही केले. (एके वर्षी तर, वाघ मंडळींचं मन मोडवेना म्हणून, फुलराणीसाठी, संपूर्ण आरोग्य- पुरवणीच मी लिहून दिली).

अंबादास यांना वाचनाची मनापासून आणि इतकी आवड होती की, दर्जेदार पुस्तकं म्हणजे त्यांचे जिवलग मित्र, सुहृद वगैरे सर्वकाही होते. साहित्याच्या या जबरजस्त आवडीमुळेच केवळ, नोकरी सांभाळून त्यांनी पत्रकारिता चालू केली. खांदेशच्या जवळपास सगळ्या दैनिकांमधून आणि साप्ताहिकांमधून, ते बातम्या, लेख, मुलाखती, व्यक्तिपरिचय अशा विविध विषयांवर लेखन करीत. त्यामुळेच "जेष्ठ पत्रकार" म्हणून त्यांना समाजात मानाचं स्थान प्राप्त झालं होतं.

अंबादसना शालेय जीवनापासूनच कथा, कविता आणि कादंबरी या विषयांमधे विशेष गोडी होती. त्यांनी असंख्य कविता केल्या, तशाच कथाही लिहिल्या.बहुसंख्य कथा अगदी साध्या, सोप्या,सरळ आणि घरगुती किंवा ग्रामीण वातावरणामधल्या, पण थेट मनाला जाऊन भिडणाऱ्या असत. आणि वेळोवेळी त्या विविध मासिकांमधून छापल्याही जात.

इंग्लंडहून परतल्यावर मी देखील कॅन्सर आणि आरोग्य या विषयांवर बरेच लेख आणि पुस्तकं लिहिली. त्या काळामधल्या माझ्या सगळ्या पुस्तकांच्या प्रचाराचं काम खांदेशात केवळ आणि केवळ अंबादास यांनी केलं. त्यासाठी त्यांनी खूप मेहनत, कष्ट आणि परिश्रम घेतले. त्यांच्या त्या आपुलकीसाठी, त्यांची मी कायमचीच ऋणी राहीन.

मुलाखती घेणं हा देखील अंबादास यांचा आवडता छंद होता. ते उत्तम चित्रकारही होते. पण त्याव्यतिरिक्त, त्यांनी अगदी जिवाभावाच्या व्यक्तिपेक्षाही प्रेमानं आणि मर्मबंधातल्या ठेवीसारखा जपलेला छंद म्हणजे रोजनिशीलेखनाचा. मला वाटतं जेंव्हापासून त्यांनी हे काम हाती घेतलं (साधारण वयाच्या पंधराव्या वर्षापासून) तेंव्हापासून एकही दिवस दैनंदिनी-लेखनाचा शिरस्ता त्यांनी मोडला नसावा. गप्पांमधे मध्यरात्र उलटली तरी त्यांचं रोजनिशी लेखन टळत नसावं.

अत्यंत प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि साधी सरळमार्गी विचारसरणी हा त्यांचा स्थायीभाव होता. सामान्य आर्थिक परिस्थितीमधून धडपड करून अंबादास यांनी यश प्राप्त केलं होतं. त्यांची सहचारिणी आणि माझी

आजतागायतची अत्यंत जिवाभावाची मैत्रिण, हिचंही कर्तृत्व फार मोठं आणि वाखाणण्यासारखंच आहे. चार मुलांचा संसार आणि यशस्वी गृहिणीबरोबरोबच, समाजकार्य आणि लोकांना कुठल्याही अडचणीत मदतीसाठी धांवून जाण्याचा तिचा स्वभाव. आज चारही मुलं आपआपल्या कुटुंबासोबत आनंदात आहेत.

अंबादास व विभावरी वाघ यांच्या समवेत मी (२००८)

● (मात्र दुर्दैवानं आज "फुलराणी" अस्तित्वात नाही आणि अंबादास यांनीही काही महिन्यांपूर्वी या जगाचा निरोप घेतला. अंबादासचा विरह सहन न झाल्यामुळे की काय, माझी जिवलग मैत्रीण विभावरी, हिनेही नुकताच आम्हा सर्वांचा कायमचा निरोप घेवून, स्वर्गवासी होणे पसंत केले. त्यामुळे उरल्या आहेत फक्त त्या दोघांच्या प्रेमळ आणि दिलदार स्वभावाच्या भरभरून आठवणी!)

****

पुस्तकाचा समारोप

माझ्या रोजनिशीचं आजचं पान:

जाता जाता निरोपापूर्वी एक छोटासा **शुभ-संदेश** तुम्हा सर्व सुजाण, सूज्ञ आणि रसिक वाचकांना मनापासून द्यावासा वाटतो. पण त्याआधी प्रथमत: मला ई-साहित्य प्रतिष्ठानच्या समस्त कार्यकर्त्यांचे, ते करीत असलेल्या निस्पृह आणि निरहंकारी साहित्य-सेवेबद्दल मनापासून **(from the bottom of my heart)** कृतज्ञतापूर्वक आभार मानायचे आहेत. आणि माझी सद्भावना व्यक्त करायची आहे.

जगभरामधल्या आपल्यासारख्या सगळ्या वाचनप्रेमी मराठी वाचकांसाठी, जे प्रचंड शब्दभांडार-(नव्हे शब्दरत्नांची खाणच!) चौदा वर्षांच्या दीर्घ परिश्रमातून त्यांनी आपल्यापुढे रिक्त केली आहे आणि सातत्यानं करीत आहेत, त्याबद्दल त्यांचं जेवढं कौतुक आपण करू, तेवढं कमीच ठरेल.

आपण नुसतं **“खुल जा सिम सिम”** एवढं म्हणून कळ दाबली, की त्या मौल्यवान गुहेची द्वारं आपल्यासाठी सताड उघडी होऊन, आतला पुस्तकांचा डोळे दिपवणारा खजिना, क्षणाचाही विलंब न लावता नजरेसमोर उभा रहातो. लगेच आपण अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्याप्रमाणे

आपल्याला आवडणाऱ्या विषयाचं नाव निवडायचं आणि बस्स दुसरी कळ दाबायची, की हवी ती पुस्तकं निवडायला तुम्ही मोकळे.

दिला की नाही मी एक सुखद धक्का? पुढचं सगळं काम मात्र तुम्हीच करायचं आहे! मी तर नित्यनेमानं, एकही दिवस न चुकवता त्यांच्या या “मोह पाडणाऱ्या” संकेत स्थळाला आवर्जून भेट देते. तिथे मला माझे सगळे सुहृद भेटतात आणि खूप सुखसंवादही आपोआपच घडतात. त्यामुळे आपलीही कधीतरी तिथे निश्चितच भेट होईल.

आजच्या दिवशी मी पण एका छोट्याश्या नजराण्याची त्यात भर घालते आहे. बघा शोधून काही नवं हाती गवसलं तर! त्याबद्दल मला कळवायला मात्र विसरू नका हं! मी वाट बघेन.

भेटू या तर मग आपल्या ठरलेल्या संकेतस्थळी!

परिशिष्ट

लेखिकेसंबंधी थोडेसे (महाराष्ट्र आणि इंग्लंड)

शिक्षण :

- बी.एस्सी (प्रताप कॉलेज अंमळनेर-पुणे विद्यापीठ) प्रथम आल्याबद्दल कॉलेजचे पारितोषिक.
- एम.एस्सी व पी.एचडी (व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटी – मँचेस्टर, इंग्लंड) जीवशास्त्र विषयात ५ वर्षे संशोधन करून.

अनुभव :

- कमलाबाई कन्या विद्यालय - धुळे

(३ वर्षे शिक्षिका म्हणून नोकरी)

- युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर – इंग्लंड

(३ वर्षे बी.एस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी डेमॉन्स्ट्रेटर)

- ख्रिस्ती कॅन्सर हॉस्पिटल आणि होल्ट रेडियम इन्स्टिट्यूट –मॅन्चेस्टर

(७ वर्षे कॅन्सर संशोधन क्षेत्रात काम)

कार्य :

●मराठी जनतेसाठी **कॅन्सर-शिक्षणाच्या प्रचाराचे कार्य**

(१५ वर्षे - पुणे आणि इतर शहरे)

●सुमारे शंभर **लेख आणि लेखमाला** प्रसिध्द

(विविध दैनिके, साप्ताहिके, मासिके, स्मरणिका, दिवाळी अंक)

●**समाजप्रबोधन आणि जनजागृती**

(महिला मंडळे, शाळा, महाविद्यालये, कार्यालये, रोटरी क्लब्ज इत्यादी संस्थांमधे भाषणे, चर्चा, प्रश्नोत्तरे)

●**आकाशवाणी, पुणे**

(भाषणे, चर्चा, मुलाखती)

●**सल्लागार** – विदर्भ कॅन्सर रिलीफ सेंटर, कारंजा (जि. आकोला)

●**सहसंपादन**

▪फुलराणी दिवाळी अंक (शहादा)

▪दीनदयाळ हॉस्पिटल आणि कॅन्सर रिसर्च सेंटर ("दीनदयाळ वार्ता" हे मुखपत्र)

▪हृदयरोग स्मरणिका (दीनदयाळ हॉस्पिटल)

●**अध्यक्ष** – श्री. सरस्वती शिशु मंदिर व प्राथमिक विद्यालय, कोथरूड, पुणे.

●**डायरेक्टर** – कॅन्सर एज्युकेशन कॅम्पेन – केअर इंडिया मेडिकल सोसायटी, पुणे.

●**सहसंचालक** – होलिस्टिक क्लिनिक – सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी विविध उपचार पध्दती केंद्र, पुणे

●**संचालन** – कॅन्सर दिलासा केंद्र – कॅन्सररुग्ण आणि त्यांचे नातेवाईकांसाठी मदत योजना व सल्ला (विनामूल्य), पुणे.

●**लेखन** - १९८५ – २०२० या काळात कॅन्सर आणि आरोग्याच्या विविध विषयांवर बारा पुस्तके प्रकाशित (तपशील खाली)

सन्मान :

●**प्रमुख पाहुणी व अध्यक्ष** – हिरक महोत्सव आणि ६१वा वर्धापन दिन, कमलाबाई कन्याशाळा, धुळे, १९८८

●**भाषणासाठी निमंत्रण** – टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सुवर्णमहोत्सवी जागतिक परिषदेनिमित्त. १९९२, मुंबई.

●**सन्मानकरी** – अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषद, धुळे. डिसेंबर १९९४.

इतर :

●आरोग्यावरील लेखनाबरोबरच- संगीत, चित्रकला, काव्य, नृत्य इत्यादी विषयांवर ललित लेखन, समीक्षणात्मक लेख, मुलाखती इत्यादी प्रसिध्द. (इंग्लंड आणि महाराष्ट्र)

●होमिओपॅथी, मॅग्नेटोथेरपी, योगासने, फोटोग्राफी, वाचन, ज्योतिष, प्रवास, इत्यादी विषयांची आवड व छंद.

●जर्मन-फ्रेंच आणि संगणकांच्या भाषा यांचा अल्पसा अभ्यास.

●संगीत (शास्त्रीय संगीत, हार्मोनियम, की-बोर्ड, व्हायोलिन, सतार आणि संगीत संग्रह) यांचेमधे रुची.

●हस्तकला, गृहसजावट, शिवणकला, भरतकाम यांचा दीर्घकाळाचा छंद.

●टेबल टेनिस, बॅडमिंटन, टेनिस, पोहणे एकेकाळचे आवडते उपक्रम.

छापिल प्रकाशित पुस्तके

	पुस्तकाचे शीर्षक	पृष्ठ संख्या	प्रकाशन दिनांक	प्रकाशक
१	**कॅन्सरची कहाणी**	४४४	१ डि.१९८५	प्रपंच प्रकाशन पुणे
२	**कॅन्सरपासून बचाव**	१०७	२६ जाने.१९८७	प्रपंच प्रकाशन
३	**कॅन्सरशी झुंज**	१५५	२८ऑगस्ट १९८७	प्रपंच प्रकाशन
४	**कॅन्सर आणि आपण**	९०	१ जून १९९०	प्रपंच प्रकाशन
५	**आमचा काय दोष (सरोज सहस्त्रबुध्दे व अनु भागवत)**	११५	२८ डि.१९९२	साधना प्रकाशन पुणे
६	**कॅन्सर और हम**	८०	२६ जाने.१९९५	परिमल प्रकाशन औरंगाबाद
७	**परिचय शरीराचा**	१५३	२६ जाने.१९९५	परिमल प्रकाशन
८	**विकार-व्याधी-उपाधी**	११८	१ मे १९९५	परिमल प्रकाशन
९	**रोगचिकित्सा-रोगनिदान**	११२	२० एप्रिल १९९६	परिमल प्रकाशन
१०	**असे इलाज-असे उपचार**	१२०	१५ जून १९९८	परिमल प्रकाशन
११	**आरोग्य-स्वच्छता-स्वास्थ्य**	१०८	२० एप्रिल १९९६	परिमल प्रकाशन
१२	**परिचय शरीराचा (द्वितीय आवृत्ती)**	२७५	५ जानेवारी २०२०	परिमल प्रकाशन

ई-पुस्तके



https://youtu.be/R0CxudbOWAs

https://youtu.be/N_kiJEW1DRw



https://youtu.be/bMqW0hIeNdo

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.

डॉ. सरोज सहस्रबुद्धे यांचे हे पाचवे पुस्तक.

डॉ. सरोज सहस्रबुद्धे या १९६४ साली भारतातून उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधे गेल्या. शिक्षणानंतर तेथे त्यांनी कॅन्सरच्या क्षेत्रात बरीच वर्षे काम केले. या सर्व काळात त्यांनी आपल्या विहित क्षेत्रातील भरघोस कामाबरोबरच, भारतीय संगीत, कला आणि संस्कृती, इंग्लंडमधे रुजवण्याचे व फ़ुलवण्याचे महद्‌कार्य केले. भारतात परतल्यावर त्यांनी कॅन्सर आणि आरोग्य याच क्षेत्रात काम करून, आरोग्य शिक्षणाचा प्रचार केला आणि त्या विषयांवर अनेक पुस्तके लिहिली. त्या पुस्तकांना वाचकांकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. सध्या त्यांचं वास्तव्य पुन्हा इंग्लंडमधेच आहे. आता त्यांनी, जगभरच्या मराठी वाचकांसाठी अनेक पुस्तके ई- साहित्यतर्फ़े विनामूल्य प्रसारित करण्याचं काम हाती घेतलं आहे. त्यांच्या या ज्ञानयज्ञात त्यांचे चिरंजीव डॉ. नील यांनीही आता सहभाग घेतला आहे.

डॉ. सरोज सहस्रबुद्धे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड.

अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (५)

असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।